म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चा. वा.
दा. क्र. २५१९

२५१९

# संतांच्या गोष्टी

IRBK-0102519
IRBK-0102519

०१३०

ठाणे
विषय
क्र. नं.
वा.

# संतांच्या गोष्टी

त्र्यंबक रामचंद्र गोडगे,
बी ए, बी. टी.

स. ग्रं. सं. ठाणें
९२१
IRBK-0102519
IRBK-0102519

दा. क्र. २५१८,

प्राथमिक शाळेच्या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें लिहिलेल्या

# संतांच्या गोष्टी

म. ह. सं. ग्रं. वाचनालय शाखा,
दा. क्र. २५१८ सौ. चि. ..........
क्र. ९१ : ९१ ..........

लेखक
त्र्यंबक रामचंद्र गोडगे
बी. ए., बी. टी.

आवृत्ति पहिली १९४६

किंमत आठ आणे

प्रकाशक

त्र्यंबक रामचंद्र गोडगे, बी. ए., बी. टी., नासिक,

मेसर्स जोशी आणि लोखंडे,

३३५ शनिवार, पुणें २ यांचेकरितां—

★

मुद्रक

प्रल्हाद भास्कर काळे

प्रतिभा मुद्रणालय,

३३५ शनिवार पेठ, पुणें २

# दोन शब्द

लहान मुलांना थोर पुरुषांच्या गोष्टी फार आवडतात. लहान मुले अनुकरणशील असतात. त्यांना अशा तऱ्हेच्या गोष्टी वाचावयास देणे फायदेशीर ठरतें. या पुस्तकांत हिंदुस्थानांतील व इतर देशांतील थोर संतांच्या गोष्टी दिल्या आहेत.

महात्मा गौतमबुद्ध यांच्या गोष्टीपासून या पुस्तकाला सुरवात केली आहे. त्यानंतर येशूखिस्त व महंमद पैगंबर या खिस्ती व मुसलमानी या प्रमुख धर्मांच्या संस्थापकांच्या गोष्टी आहेत. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम वगैरे महाराष्ट्रांतील प्रसिद्ध संतांच्या गोष्टीहि तुम्हांला या पुस्तकांत वाचावयास मिळतील. एकंदर तेरा संतांच्या गोष्टी या पुस्तकांत कालानुक्रमानें दिल्या आहेत. शेवटची गोष्ट महात्मा गांधी यांची आहे. सध्याच्या काळांत हिंदुस्थानांतील अत्यंत थोर व पूज्य पुरुष अशी त्यांची जगांत प्रसिद्धी आहे. पूर्वीच्या काळीं होऊन गेलेल्या साधुसंतांपेक्षां त्यांची योग्यता रतिभरहि कमी नाहीं.

शिक्षकानें या गोष्टी प्रथम मुलांना सांगाव्यात. गोष्ट सांगून झाल्यावर धड्यांच्या शेवटीं दिलेले प्रश्न त्यांना विचारावेत. नंतर त्यांना या गोष्टी वाचावयास द्याव्यात. या गोष्टी शिकवितांना मुलांचें भाषाज्ञान वाढेल व हिंदी संस्कृति व धर्म यांच्याविषयीं त्यांना प्रेम उत्पन्न होईल, अशी शिक्षकांनीं दृष्टि ठेवावी.

१ नोव्हेंबर १९४६
नासिक.

—त्र्यं. रा. गोडगे

# अनुक्रम

—:०:—


| | | |
|---|---|---|
| १ महात्मा गौतम बुद्ध | ... ... | १ |
| २ येशू ख्रिस्त | ... ... | ८ |
| ३ महंमद पैगंबर | ... ... | १४ |
| ४ शंकराचार्य | ... ... | २१ |
| ५ ज्ञानेश्वर | ... ... | २७ |
| ६ नामदेव | ... ... | ३२ |
| ७ सांवता माळी | ... ... | ३६ |
| ८ एकनाथ | ... ... | ३९ |
| ९ तुकाराम | ... ... | ४३ |
| १० रामदास | ... ... | ४८ |
| ११ स्वामी दयानंद सरस्वती | ... | ५२ |
| १२ स्वामी विवेकानंद | ... ... | ५६ |
| १३ महात्मा गांधी | ... ... | ६१ |

# संतांच्या गोष्टी

## १ महात्मा गौतम बुद्ध

आपल्या हिंदुस्थान देशाच्या उत्तरेस हिमालय नांवाचा उंच पर्वत आहे. त्याच्या पायथ्याजवळ नेपाळ हा प्रांत आहे. सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वी तेथें शुद्धोदन नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला मायावती व गौतमी अशा दोन राण्या होत्या. त्या दोघीजणी सख्या बहिणी होत्या. परंतु एकीच्याही पोटीं मूलबाळ नसल्यामुळें राजा फार कष्टी होता. त्याच्याप्रमाणें त्याच्या राण्यांनाहि फार दुःख होत होतें.

अशा दुःखीकष्टी स्थितींत दिवस कंठीत कंठीत राजा म्हातारा झाल्यावर त्याला आनंद देणारी एक गोष्ट घडली. त्याची वडील राणी मायावती ही गरोदर राहिली. पुढें योग्य वेळीं ती प्रसूत होऊन तिला एक सुंदर मुलगा झाला. कितीतरी वर्षांनंतर राजाच्या राजवाड्यांत पाळणा हलूं लागला. त्यामुळें राजघराण्यांतील मंडळींचा आनंद गगनांत मावेना. परंतु हा आनंद फार दिवस पाहाण्याचा योग मायावती राणीच्या नशिबांत नव्हता. पुत्राच्या जन्मानंतर सात–आठ दिवसांनीं ती मरण पावली.

मुलाचें बारसें मोठ्या थाटानें पार पडलें. त्याचें नांव सिद्धार्थ असें ठेवण्यांत आलें. तेथून पुढें गौतमीनेंच त्या बालकाचा सांभाळ केला. त्याला तिचा इतका लळा लागला कीं, आपली सख्खी आई मरण पावली आहे, ही गोष्ट त्याला समजलीदेखील नाहीं. गौतमी ही जशी त्याची आई होती, तशी मावशीहि होती. तिच्या पोटीं तरी मूलबाळ कोठें होतें !

म्हणून आपल्या बहिणीच्या मुलाला ती फार जीव लावीत असे. तिच्या नांवावरून लोक त्याला गौतम असेंहि म्हणूं लागले.

गौतम थोडा मोठा झाल्यावर राजाला वाटलें, आपल्या मुलाचें भविष्य पाहावें. त्या कामासाठीं त्यानें एका हुशार ज्योतिष्याला बोलाविलें. मुलाचा हात पाहून ज्योतिषि म्हणाला, "राजा, हा मुलगा फारच थोर माणूस होईल." हें भविष्य ऐकून राजाला फार आनंद झाला. त्याला वाटलें आपला मुलगा मोठा पराक्रमी राजा होईल. पण ज्योतिषाचें पुढचें भाषण ऐकून त्याचा आनंद पार मावळला. ज्योतिषिबुवा पुढें बोलूं लागले,

"राजा, हा मुलगा मोठा राजा होणार नाहीं, तर संन्यासी होईल. तथापि हा संन्यासीच गोरगरीबांचा उद्धार करील. पराक्रमी राजांचीं नांवें लोक विसरतील, परंतु ह्याचें नांव जगाच्या अंतापर्यंत लोक आठवत राहातील."

आपला मुलगा अंगाला राख फासणारा संन्यासी होणार आहे, ही गोष्ट कोणत्या बापाला आवडेल बरें? शुद्धोदन तर बोलून चालून राजाच. त्याला थोडाच ह्या भविष्यानें आनंद वाटणार? त्यानें तें भविष्य खोटें करून दाखविण्याचें ठरविलें. सिद्धार्थानें पराक्रमी राजा व्हावें म्हणून त्याच्या वडिलांनीं त्याला राजपुत्रास योग्य असें शिक्षण देण्यास गुरु ठेविले. त्याच्या मनाला दुःख होऊन त्यानें संन्यासी मार्गाला लागूं नये, म्हणून त्याच्याभोंवतीं सुखाच्या सर्व सोयी करण्यांत आल्या. हेतु हा कीं, जग म्हणजे सुखाचा स्वर्ग आहे, असें गौतमास वाटावें.

पण राजाचा हा हेतु तडीस गेला नाहीं. बापानें इतकी खबरदारी घेतली तरी शेवटीं गौतमाच्या दृष्टीस सभोंवतालचे दुःखदायक देखावे पडलेच. त्याच्या चुलत भावानें एका गरीब पांखरास बाण मारल्यामुळें तो पक्षी घायाळ होऊन जमीनीवर पडला. त्या वेळीं भावाशीं भांडण करून



गौतमानें त्या पक्ष्याला घेतलें व पाणी पाजून त्याला सोडून दिलें. तसेंच, एकदां तो नगराबाहेर फिरावयास गेला असतां एक शेतकरी आपल्या गरीब बैलांना मारीत असतांना त्याला दिसला. थोड्याच अंतरावर त्यास आणखी एक करूण देखावा दिसला. शेताच्या कुपाटीजवळ एक सरडा गरीब बिचाऱ्या मुंग्यांना खात होता. इतक्यांत कुंपणांतून एक साप निघाला व त्यानें सरड्याला गट्ट केलें. सरड्यास खाऊन साप थोडा पुढें सरपटतो तोंच आकाशांतून एका घारीनें त्याच्यावर झडप घालून त्याला वर नेलें. सापाला खात घार झाडावर बसली आहे, हें एका पारध्यानें पाहून तिला बाण मारिला. लागलीच घार खालीं पडली. हे सर्व प्रसंग अगदीं थोड्या वेळांत घडले. ते पाहून गौतमाच्या हृदयाला दुःखाच्या वेदना झाल्या. तो मनाशीं म्हणाला, " मला वाटतें होतें कीं, जगांत चोहींकडे सुख आहे; पण मला आतां असें वाटतें कीं, जगांत सर्व ठिकाणीं दुःख आहे व जे बलवान आहेत ते गरिबांचा छळ करीत आहेत. "

गौतम सतरा अठरा वर्षांचा झाला. धनुष्यानें नेम मारणें. घोड्यावर बसणें वगैरे गोष्टींत तो तरबेज झाला. याच सुमारास शेजाऱ्याच्या प्रांताच्या राजानें असा पण जाहीर केला कीं, " धनुर्विद्येंत जो राजपुत्र सर्वांहून अधिक कौशल्य दाखवील त्याच्याबरोबर माझी सुंदर कन्या यशोधरा हिचें लग्न मी लावीन. " गौतमानें राजाचा पण जिंकल्यामुळें सुंदर राजकन्या यशोधरा हिच्याबरोबर त्याचें लग्न मोठ्या थाटानें झालें.

गौतमाच्या बापाला वाटलें, आतां आपल्या मुलाचें मन संसारांत रमेल. यशोधरेसारखी सुंदर व गुणी पत्नी, राहावयास सुंदर राजवाडा, सभोंवतीं सुंदर बागा; आतां त्याच्या सुखाला काय कमतरता आहे ? त्याला वाटलें, आतां भविष्य नक्कीच खोटें ठरणार! पण गौतमाला ह्या गोष्टींपासून मुळींच सुख मिळत नव्हतें. त्याच्या मनांत दुःखदायक विचारांची केवढी वावटळ उठली होती, ह्या गोष्टीचा बिचाऱ्या बापाला पत्ताहि नव्हता !

गौतमाच्या वेळीं उत्तर हिंदुस्तानांत राहाणाऱ्या लोकांना आर्य म्हणत असत. सुरवातीस हे सर्व आर्य सारख्याच दर्जाचे होते. परंतु पुढें त्यांच्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ग पडले. त्यांपैकीं ब्राह्मणांच्या हातांत सर्व सत्ता गेली. ते इतर वर्गांना कमी लेखूं लागले. आर्य लोक इंद्र, वरूण, सूर्य इत्यादींना देव मानीत व त्यांना प्रसन्न करण्यासाठीं प्रार्थना करित. हीं प्रार्थनागीतें संस्कृत भाषेंत असत. ती भाषा खालच्या वर्गांतील आर्यांना समजत नसे. त्यामुळें आपल्याला देवाची प्रार्थना करतां येत नाहीं म्हणून त्या लोकांना वाईट वाटे. तसेंच आपल्या देवतांना प्रसन्न करण्यासाठीं आर्य लोक ( ब्राह्मण ) यज्ञ करीत. यज्ञांत हजारों पशूंना ते बळी देत. यज्ञांत होणारी हजारों निरपराधी मुक्या प्राण्यांची हत्या पाहून गौतमाचें अंत:करण दु:खानें झुरूं लागलें. हजारों गोरगरीबांवर बलवान लोकांनीं केलेला जुलूम कसा नाहींसा करावा, याचा विचार तो करूं लागला.

पुढें गौतमाला राज्याभिषेक करण्याचें त्याच्या बापानें ठरविलें. कपिलवस्तु नगरांत उत्सवाची तयारी धूमधडाक्यानें सुरू झाली. नगराची शोभा पहाण्यासाठीं गौतम रथांत बसून जात असतां त्याला एक रोगी भिकारी, एक म्हातारा व एक प्रेत हीं दिसलीं. त्याला वाटलें आपल्या सुंदर शरीराची सुद्धां पुढें अशीच दशा होणार. ह्या विचारानें त्याला अगदीं बेचैन केलें. जग हें दु:खानें भरलें आहे, अशी त्याची पक्की खात्री झाली.

जगांतील दु:खें नाहींशीं करण्यासाठीं अरण्यांत जाऊन तपश्चर्या करण्याचें त्यानें ठरविलें. रात्र झाल्यावर आपली पत्नी व नेटकाच जन्मलेला आपला लहानसा बाळ राहूल ह्याचें शेवटचें दर्शन घेण्यासाठीं तो गेला. त्यांस पाहून गौतमाला मोह पडला. त्याच्यानें त्यांना सोडून जावेना. परंतु आपल्या मनाचा निश्चय करून तो कोणालाच न कळवितां अरण्यांत निघून गेला. त्याचे आईबाप व पत्नी ह्यांनीं खूप शोक केला.

अरण्यांत गेल्यावर उपवास करून व शरीराला कष्ट देऊन त्यानें बरींच वर्षें तपश्चर्या केली. तो इतका अशक्त झाला कीं, भूक लागल्यामुळें त्याला एकदां भोंवळ आली. एका गुराख्यानें त्याला दूध पाजल्यामुळें त्याला शुद्धी आली. शरीराला कष्ट देऊन परमेश्वर भेटत नाहीं, असा त्याचा पक्का समज झाला. नंतर तो गया ह्या गांवीं एका झाडाखालीं तप करूं लागला. त्याला जगाचें खरें ज्ञान प्राप्त झालें व लोक त्याला 'बौद्ध' म्हणजे ज्ञानी असें म्हणूं लागले.



मग तो लोकांचीं दुःखें नाहींशीं करण्यासाठीं उपदेश करूं लागला. तो लोकांना सांगूं लागला, "हजारों निरपराधी प्राण्यांना विनाकारण ठार कां करतां? ही गोष्ट देवाला मुळींच आवडणार नाहीं. सर्वांनीं खरें बोलावें. प्राण्यावर दया करावी. कोणीं कोणाला कमी लेखूं नये व चांगल्या मार्गानें वागावें. असें केलें म्हणजे सर्व लोक सुखी होतील;"

त्यानें आपला उपदेश खालच्या वर्गांतील लोकांची भाषा जी पाली तिच्यांत लिहिला. ब्राह्मण लोक आपणांस हलके समजतात. संस्कृत भाषेंतील प्रार्थना आपणांस समजत नाहींत. यज्ञांत ब्राह्मण हजारों प्राण्यांना बळी देतात. त्यापेक्षां सर्वांना सारखें मानणारा, प्राण्यांवर दया करण्यास सांगणारा व आपणांस येणाऱ्या पाली भाषेंतला बौद्ध धर्मच चांगला, असें खालच्या लोकांना वाटलें व ते बौद्ध धर्मांत आले. बुद्धानें स्थापन केलेला बौद्धधर्म हल्लीं ब्रह्मदेश चीन, जपान इत्यादि देशांत चालू आहे.

## प्रश्न

१ शुद्धोधन राजा कष्टी कां होता ?

२ 'माय मरो, पण मावशी उरो' अशी मराठी भाषेंत एक म्हण आहे. ही म्हण गौतमाच्या बाबतींत कशी खरी ठरली ?

३ ज्योतिषानें गौतमाचें कोणतें भविष्य सांगितलें ? या भविष्याचा राजाच्या मनावर काय परिणाम झाला ?

४ गौतमाच्या दृष्टीस कोणकोणते देखावे पडले ? हे देखावे पाहून त्याच्या मनावर काय परिणाम झाला ?

५ गौतमाच्या लग्नाची माहिती सांगा.

६ गौतमानें संसाराचा त्याग कां केला ?

७ गौतमानें स्थापन केलेल्या बौद्ध धर्माचीं तत्त्वें कोणतीं ?

# २ येशू ख्रिस्त

" पूर्व देशाला एक फार तेजस्वी तारा लवकर चमकूं लागेल. त्याच वेळीं गोरगरीबांचा उद्धार करणारा देवाचा पुत्र जन्माला येईल." हें भविष्य बरेंच दिवस पॅलेस्टाईन प्रांतांतील लोकांच्या तोंडीं होतें. परमेश्वराचा पुत्र कधीं जन्माला येईल इकडे लोकांचे डोळे लागून राहिले होते.

पॅलेस्टाईन हा आशिया खंडांत एक प्रांत आहे. तेथें पूर्वी यहुदी या नांवाचे लोक राहात असत. ह्या लोकांची अशी समजूत होती कीं, इतर लोकांपेक्षां आपण देवाचे लाडके आहोंत व जगांतील सर्व वैभव देवानें आपल्याचसाठीं निर्माण केलें आहे. ह्या चुकीच्या कल्पनेमुळें ते लोक गर्विष्ठ बनले. गोरगरीबांना लुबाडून यहुदी सावकार गबर बनले आणि संपत्ति जवळ असल्यामुळें वाटेल तसलीं दुष्कर्में करूं लागले. देवाचीं मंदिरें तर यहुदी पुजाऱ्यांच्या मालकीचींच बनलीं. देवाच्या नांवावर ते गरीब लोकांचा पैसा आपणाकडे ओढूं लागले. सावकारांनीं व्यापारपेठेला चोरबाजाराचें रूप आणिलें, तर पुजाऱ्यांनीं पवित्र मंदिरांना पापी मठाची कळा आणिली. सत्ता आणि संपत्ति यांच्या जोरामुळें गरीब जनता आपणांवर होणारा अन्याय मुक्या मेंढरांप्रमाणें सहन करीत होती. त्यामुळेंच लोक आपला उद्धार करणाऱ्या देवपुत्राच्या जन्माची आतुरतेनें वाट पहात होते.

त्या प्रांताची खानेसुमारी ( माणसांची मोजणी ) चालली होती. अधिकारी लोक माणसांची मोजणी करीत होते. प्रत्येक माणूस सरकारी कचेरींत जाऊन आपली माहिती देई. नासरेथ गांवचा योसेफ सुतार व त्याची पत्नी मरिया हीं दोघें जवळच असलेल्या बेथलेम गांवीं आपली माहिती देण्यासाठीं गेलीं. या वेळीं मरिया गरोदर होती; म्हणून योसेफ



(४)

रात्रीं मुक्कामासाठीं चांगली निवाऱ्याची जागा शोधूं लागला. परंतु त्याची निराशा झाली. शेवटीं एका गुरांच्या गोठ्यांत त्यांना जागा मिळाली. त्याच रात्रीं मरिया प्रसूत झाली व तिला मुलगा झाला. गुरांच्या गोठ्यांत माणसांची सोय ती काय असणार ? मरियेनें आपल्या लहान बाळास फडक्यांत गुंडाळून गव्हाणींत निजविलें.

त्याच रात्रीं रानांत शेकोटीभोंवतीं कांहीं धनगर गप्पा मारीत बसले असतां एक देवदूत त्या ठिकाणीं आला व म्हणाला, “ गरिबांचा उद्धार करणारा देवपुत्र गावांत जन्माला आला आहे. गुरांच्या गोठ्यांतील गव्हाणींत सध्यां तो आहे.” ही बातमी ऐकून धनगर लोक आनंदानें गांवाकडे धावतच आले. पाहातात तों देवदूतानें सांगितल्याप्रमाणें एक लहान मूल गव्हाणींत पडलें होतें. त्याला नमस्कार करून व घडलेली हकीकत लोकांना सांगत सांगत धनगर लोक परत गेले.

याच वेळीं पूर्व दिशेला एक तेजस्वी तारा दिसूं लागला. लोकांची खात्री झाली कीं, भविष्यवाणीप्रमाणें देवपुत्र जन्माला आला. लागलीच ज्योतिषी लोक त्या देवपुत्राच्या तपासास निघाले. त्या ताऱ्याच्या पाठोपाठ जात जात ते ज्या ठिकाणीं तारा थांबला तेथें येऊन पोहोंचले. पहातात तों गुराच्या गोठ्यांत एक तेजस्वी लहान बालक ! त्याची पूजा करून ज्योतिषी निघून गेले.

योसेफ व मरिया यांच्या आनंदास तर सीमाच राहिली नाहीं. त्यांनीं आपल्या मुलाचें नांव ‘ येशु ’ असें ठेविलें. त्यानेंच पुढें ख्रिस्ती धर्म स्थापन केला व त्याच्याच थोरपणामुळें त्याच्या जन्मापासून इसवी सन ही कालगणना सुरू झाली. गौतम बुद्ध हा येशूच्या जन्माच्या ६२३ वर्षांपूर्वीं जन्मला, म्हणजे इसवी सनापूर्वीं ६२३ मधें जन्मला.

त्या काळचा राजा हेरोड ह्याला वाटलें कीं, आतां सर्व लोकांचें लक्ष देवपुत्राकडे लागेल व आपलें महत्त्व उरणार नाहीं. यासाठीं त्यानें त्या

मुलाला ठार मारण्याचा घाट घातला. ही गोष्ट येशूच्या आईबापांना कळल्या-बरोबर ते आपल्या मुलाला बरोबर घेऊन दुसऱ्या देशांत गेले.

पुढें तो शाळेंत जाऊं लागला. त्याची हुशारी पाहून गुरुलोकहि थक्क होऊन जात. पुढें पुढें तर मोठमोठे विद्वान् लोकसुद्धा त्याच्याशीं संभाषण करण्यांत हार जाऊं लागले.

कांहीं दिवसांनंतर येशु योहान ह्या नांवाच्या सत्पुरुषाच्या दर्शनास गेला. योहान हा उंटाच्या कातड्याचे कपडे वापरीत असे. कंदमुळें व रानांतील मध हेंच त्यांचें अन्न. पापी व गरीब लोकांना मदत करून चांगला मार्ग दाखविण्याचें काम तो करीत असे. त्यामुळें गोरगरीब त्याला 'गुरु' समजत असत. योहानचा उपदेश फार सोपा असे. तो लोकांना सांगे, "हे पापी लोकहो, तुम्ही ह्या जॉर्डन नदींत स्नान करा व केलेल्या वाईट कर्मांबद्दल तुम्हांला पश्चाताप वाटूं द्या; म्हणजे देव तुम्हांस क्षमा करील." हजारों लोक त्याचे शिष्य बनले. जेव्हां येशु त्यांच्याकडे शिष्य होण्यासाठीं गेला, तेव्हां त्याला पाहून योहान म्हणाला, "तूंच देवाचा पुत्र आहेस. तुला मी काय शिकविणार?"

योहान मरण पावल्यानंतर येशु लोकांना उपदेश करीत फिरूं लागला. "देवाची मनोभावानें प्रार्थना करीत जा. आपल्या शत्रूवरसुद्धां प्रेम करा. चांगल्या माणसाच्या शेतावर पडावें व दुष्ट माणसाच्या शेतावर पडूं नये, असा भेद पाऊस कधीं करतो कां? सद्गुणी माणसाला प्रकाश द्यावा व दुष्टांना देऊं नये' असें सूर्य कधीं करतो कां? तुम्हीसुद्धां सर्वांवर प्रेम करीत जा. संपत्तीच्या मागें लागूं नका. तसेंच सदा नम्रता धरा." हेंच येशूच्या उपदेशाचें सार आहे. येशूचा उपदेश पटून पुष्कळ लोक त्याचे शिष्य होऊं लागले.

तो गरीबांच्या कल्याणासाठीं झटत आहे, असें पाहून भिकारी व रोगी त्याच्याभोंवतीं जमूं लागले. त्या सर्वांना त्यानें आपापल्या रोगां-

पासून बरे केले. एका महारोगी भिकाऱ्याच्या अंगावरून येशूनें हात फिरवितांच तो साफ बरा झाला. तसेंच एका श्रीमंताच्या मुलाला फेफरें येत होते; पुष्कळ औषधें घेऊनहि गुण येईना. म्हणून तो येशूकडे आला. येशूचा स्पर्श होतांच तो खडखडीत बरा झाला. असें सांगतात कीं, एकदां तर त्यानें मेलेलासुद्धां जिवंत केला.

जसजशी येशूची कीर्ति पसरत चालली तसतशी त्याच्याभोंवतीं लोकांची गर्दी जमूं लागली. एकदां त्याचा उपदेश ऐकावयास पांच हजार लोक जमले. उपदेश संपला. रात्र संपली आणि गांव तर दूर. आतां लोकांच्या खाण्याची सोय कशी करावयाची, असा येशूच्या शिष्यांना विचार पडला. त्याच्याजवळ फक्त सात भाकरी व मासे होते. येशूनें फक्त त्या वस्तूंकडे पाहिलें मात्र, तों त्यांचा पांच हजार माणसांना पुरून उरेल इतका स्वयंपाक झाला.

त्यानंतर त्यानें येरूशलेम ह्या गांवाकडे आपला मोर्चा वळविला. येरुशलेम येथें यहुद्यांचें पवित्र मंदीर होतें. देवाच्या नांवावर गरीब भक्तांना तेथील पुजारी व सावकार लुटीत असत. येशूला ह्या गोष्टीचा खूप संताप आला. तो त्यांना रागानें म्हणाला, "तुम्ही भोळ्याभाबड्या लोकांना फसवून त्यांचे पैसे लुबाडतां; तुमच्या वाईट वागणुकीमुळें हें पवित्र मंदीर म्हणजे पापी लोकांचा अड्डा बनलें आहे. चला, चालते व्हा येथून. मी देवाचा पुत्र, यहुद्यांचा राजा, तुम्हांस आज्ञा करीत आहे." येशूला लोकांचा पाठिंबा असल्यानें पुढाऱ्यांनीं तेथून धूम ठोकली.

राष्ट्रालाहि मिळत नव्हता इतका मान सामान्य लोक येशूला देऊं लागले. मग त्यास यहुद्यांचा राजा कां बरें म्हणूं नये? येशूच्या ह्या लोकप्रियतेमुळें आतां आपलें महत्त्व कांहींच उरणार नाहीं अशी भीति श्रीमंत पुजारी, सावकार व सरकारी अधिकारी यांना वाटूं लागली. त्यांनीं त्याचा कांटा काढण्याचें ठरविलें.

यहुदा नांवाच्या येशूच्या शिष्याला त्यांनीं खूप पैसे देऊन वश केलें. यहुदा म्हणाला, ' ' मी ज्याचें चुंबन घेईन तोच येशू असें तुम्ही समजा''. मध्यरात्र झाल्यावर येशू व त्याचे इतर शिष्य ज्या पर्वताजवळ होते, त्या ठिकाणीं कटवाल्यांनीं त्यांना गांठलें. ठरल्याप्रमाणें यहुदानें येशूचें चुंबन घेतांच शिपायांनीं त्याला पकडिलें व गांवांत आणिलें. त्यानंतर त्याच्या डोक्यावर काट्यांचा मुकूट घालून लोक त्याला चिडविण्यासाठीं बोलूं



लागले, '' अहो यहुद्यांचे, राजे! '' कोणी कोणी तर त्याच्या तोंडावर थुंकले देखील. शेवटीं त्याला क्रूसावर ( फांसावर ) चढविण्यांत आलें व त्याच्या अंगांत खिळे ठोकण्यांत आले. तरी त्या थोर पुरुषाची मनाची शांति ढळली नाहीं. मरतांना त्यानें आपणास ठार मारणाऱ्या लोकांविषयीं प्रार्थना केली, '' देवा, या लोकांना तूं क्षमा कर. ते अज्ञाणी आहेत. आपण काय करतों, हें त्यांना कळत नाहीं. ''

प्रश्न

१ येशूच्या जन्मापूर्वी पॅलेस्टाईन प्रांतांतील परिस्थिती कशी होती ?
२ येशूचा जन्म कोणत्या परिस्थितींत झाला ?
३ गौतम व येशू यांच्या जन्मकालांतील फरक सांगा.
४ हेरोड राजाला कोणती भीती वाटली ?
५ येशूच्या अंगीं कोणकोणते गुण होते ?
६ येशूच्या उपदेशाचें सार सांगा.
७ येशूचा शेवट कसा झाला ?

---

# ३ महंमद पैगंबर

"ईश्वर फक्त एकच आहे व तो सर्वांहून श्रेष्ठ आहे. त्यानेंच मला तुमची सुधारणा करण्यासाठीं पाठविलें आहे." महंमदाचे हे शब्द ऐकून मूर्तीची पूजा करणारे अरब लोक त्याला 'वेडा' म्हणूं लागले व धोंडे मारूं लागले. परंतु सुरवातीला ज्या अरब लोकांनीं त्याला वेडा ठरविलें होतें, तेच लोक पुढें त्याला 'देवदूत' (परमेश्वराचा प्रेषित) म्हणूं लागले. ह्याच थोर सत्पुरुषानें मुसलमानी धर्माची स्थापना केली.

हिंदुस्थानच्या पश्चिमेस अरबस्तान यां नांवाचा देश आहे. तेथील लोकांना अरब म्हणतात. इ. स. ५७१ मध्यें (म्हणजे येशूच्या जन्मानंतर ५७१ वर्षांनीं) अरबस्तानांतील मक्का या गांवीं महंमदाचा जन्म झाला. त्याचा बाप अबदुल्ला हा त्याचा जन्म होण्याच्यापूर्वीच दोनतीन महिने अगोदर मरण पावला होता. आपलें छोटें सुंदर बाळ पाहून महंमदाची आई अमीना ही नवऱ्याच्या मरणामुळें वाटणारें दुःख विसरून गेली. परंतु महंमदाचे लाड पुरवायला त्याची आईसुद्धां फार दिवस जगली

नाहीं. त्यानंतर लहानग्या महंमदाचें पालनपोषण त्याचे चुलते अबुतालेब हे मोठ्या प्रेमानें करूं लागले. त्यांनीं त्याला आपल्या मृत आईबापांची थोडीसुद्धां आठवण होऊं दिली नाहीं.

अरबस्तान हा ओसाड वाळवंटाचा देश असल्यामुळें तेथें कोणतेंच धान्य पिकत नसे. ह्यामुळें बरेच अरब लोक मेंढ्या पाळून आपली उपजीविका करीत असत. तथापि ओसाड वाळवंटांत मधून मधून कांहीं पाणथळ जागा होत्या; तेथें मात्र खजुराचें पीक निघत असे. पण तेवढ्यावर अरबांचें पोट थोडेंच भरणार होतें ? सुखानें पोटभर अन्न मिळण्यासारखें नसल्यानें ते लोक लूटमार करीत असत. कांहीं अरब आसपासच्या देशांत खजूर घेऊन जाण्याचा व तिकडून धान्य वगैरे सामान आणण्याचा व्यापार करीत असत. वाळवंटाचा प्रदेश असल्यामुळें हा व्यापार उंटावरून चालत असे. भुकेकंगाल अरब ह्या व्यापाऱ्यांना लुबाडून आपली चैन चालवीत असत. कांहींच उद्योग नसल्यामुळें हे लोक लुटीच्या पैशांतून दारू पिणें, जुगार व वाटेल तशी चैन करणें ह्या गोष्टींत नेहमीं दंग झालेले असत. आपल्या वाईट कर्मांबद्दल आपल्याला शिक्षा करणारा कोणी एक देव असेल, याची त्यांना कल्पनाच नव्हती. उलटपक्षीं आपल्या कामांत यश देण्यासाठीं ते हजारों दगडाच्या देवांची पूजा करीत असत. एवढेंच नव्हे तर ह्या देवांना खूष करण्यासाठीं स्वतःच्या मुलींना ते जिवंत पुरीत असत. महंमदाच्या वेळीं अरब लोक अशा रानटी स्थितींत होते.

महंमद थोडा मोठा झाल्यावर आपल्या चुलत्याच्या मेंढ्या राखण्यास जाऊं लागला. रात्र झाल्यावर मेंढ्यांच्या कळपाजवळ पडून जेव्हां तो आकाशाकडे पाही, तेव्हां त्यास खूप आनंद होई. काळ्याभोर आभाळांत हिऱ्याप्रमाणें चमकणाऱ्या असंख्य चांदण्या पाहून तो थक्क होऊन जाई. हें वैभव कोणीं निर्माण केलें आहे, असा विचार तो तासच्या तास करीत पडे. पण हें कोडें त्याला लवकर सुटेना.

चुलता मरण पावल्यावर तो व्यापार करूं लागला. खजूरानें लादलेले उंट घेऊन शेजारच्या देशांत तो विकावा, तेथील माल अरबस्तानांत आणावा असा क्रम त्यानें सुरू केला. ह्या व्यापारांत जो कांहीं नफा राहील त्यावर तो आपलें पोट चालवीत असे. इतर लबाड व्यापाऱ्या-प्रमाणें लोकांना फसवून तो अधिक नफा कधींच घेत नसे. सबंध मक्का शहरांतील लोक त्याच्या अंगच्या प्रामाणिकपणाबद्दल त्याला फार मान देऊं लागले. मक्का शहरांत खदिजा नावाची एक श्रीमंत विधवा बाई राहात होती. महंमदाचा सालस स्वभाव व प्रामाणिकपणा पाहून तिनें त्याला व्यापारासाठीं पुष्कळ पैसे दिले. महमदानेंहि प्रामाणिपणानें वागून तिला खूपच फायदा मिळवून दिला. यामुळें तिची त्याच्यावर मर्जी बसली व पुढें तिनें त्याच्याबरोबर लग्न केलें. खदिजा त्याच्याहून पंधरा वर्षांनीं मोठी होती.

प्रवासामुळें महंमदाच्या पहाण्यांत निरनिराळ्या देशांतील लोक, त्यांचे रिवाज व धर्म ह्या गोष्टी आल्या. शेजारच्या प्रांतांतील ख्रिस्ती लोक, त्याच्या चालीरीति व धर्म यांचा त्याचा मनावर अधिक परिणाम झाला. अरब लोकांच्या चालीरीति, देव व धर्म किती रानटी आहेत, याची त्याला कल्पना आली. ही स्थिति नाहींशी करण्याचा कांहीं तरी प्रयत्न केला पाहिजे असें त्यास वाटूं लागलें.

महंमद जसा सद्गुणी व सालस वागणुकीचा होता, तसाच तो व्यव-हारांतसुद्धां फार हुशार व युक्तिवान होता, हे खालील गोष्टींवरून कळून येईल. मक्का शहरांत अरबांचीं तीनशेंसाठ देवळें होतीं. त्यांपैकीं काबा हें देऊळ मुख्य होतें. त्यांत एक काळा दगड होता. त्याला सर्व अरब फार पवित्र मानीत असत. काबाचें जुनें देऊळ पडल्यामुळें लोकांनीं नवीन देऊळ बांधिलें. नवीन देवळांत जुन्या देवळांतील पवित्र असा काळा दगड कोणीं नेऊन ठेवावयाचा यासंबंधीं वाद लागला. काबा देऊळ कुरेशी

नांवाच्या अरब पुजाऱ्याच्या मालकीचें होतें. त्यांच्यांत आपसांत ह्या बाबी-संबंधानें भांडणें सुरू झालीं. जो तो आपण इतरांहून श्रेष्ठ आहोंत, असें समजत होता. पुष्कळ प्रयत्न करूनहि मंदिराबद्दलचा वाद मिटेना. शेवटीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं जो मनुष्य सर्वांच्या अगोदर मंदिरांत येईल त्याचा निकाल सर्वांनीं मान्य करावा असें ठरलें. दुसऱ्या दिवशीं सर्वांच्या अगोदर मंदिरांत येणारा गृहस्थ महंमदच ठरला. त्याचा भलेपणा व प्रामाणिकपणा यांच्याबद्दल लोकांना खात्री असल्यामुळें त्याचा निकाल सर्वांनीं मान्य करण्याचें ठरविलें. महंमदानें एक युक्ति केली. त्यानें ते पवित्र दगड एका चादरीवर ठेऊन सर्व पुजारी लोकांना चादरीचे कोपरे धरण्यास सांगितलें. मग सर्वांनीं मिळून तो दगड नव्या मंदिरांत नेऊन बसविला. महंमदाच्या चातुर्यानें कुरेशी लोकांचें भांडण मिटलें व सर्वांना आनंद वाटला.

अरबांची रानटी स्थिति पाहून महंमदाला फार वाईट वाटे. ती सुधारण्याचा विचार तो रात्रंदिवस करूं लागला. तो स्वतः नेहमीं पवित्रपणानें वागे व वारंवार उपवास करी. एकदां असाच तो रानांत जाऊन देवाची प्रार्थना करीत असतां त्याला देवाचा साक्षात्कार झाला. “ परमेश्वर एकच आहे व तो सर्वश्रेष्ठ आहे, असा उपदेश तूं लोकांना कर. एवढ्याच कामासाठीं मी तुला जगांत पाठविलें आहे. ” अशी आकाशवाणी त्यानें ऐकली. त्याला खूप धीर आला. देवानें सांगितलेला उपदेश लोकांना करावयाचा असें त्यानें ठरविलें.

तो रानांतून परत मक्का शहरांत आला. बाजारपेठेंत लोक जमवून तो त्यांना सांगूं लागला कीं, “ईश्वर एकच आहे व तो सर्वांत श्रेष्ठ आहे. मी त्याचा पैगंबर, निरोप घेऊन येणारा आहे—” मूर्तीची पूजा करणारे म्हणूं लागले, “ याला वेड लागलें आहे. एकट्या मक्का शहरांतच तीनशेंसाठ देव आहेत. आणखी बाहेर कितीतरी आहेत;

आणि महंमद तर म्हणतो कीं देव एकच आहे. वेडा वेडा ! " लोच ते लोक त्याला दगड व शेण मारूं लागले. तथापि लोकांच्या छळाला न भितां महंमदानें आपलें काम चालूंच ठेवलें. पुढें पुढें त्याच्या म्हणण्यावर कांहीं लोकांचा विश्वास बसूं लागला व ते त्याच्या म्हणण्याप्रमाणें वागूं लागले. " दगडांच्या मूर्तींत देव नसतो. तो कोणालाच दिसत नाहीं. मनुष्य चांगल्या रीतीनें वागला व त्यानें त्याची प्रार्थना केली कीं, तो प्रसन्न होतो. म्हणून लोकांनीं चोरी करूं नये, दारू पिऊं नये, एकमेकांना कमी लेखूं नये, गरीबांवर उपकार करावा, उपवास करावा व देवाची प्रार्थना करावी. " हाच पैगंबरसाहेबांच्या उपदेशाचा सारांश आहे. त्यांनीं स्थापन केलेल्या ह्या नवीन धर्मास इस्लाम ( उद्धार करणारा ) अथवा मुसल्मानी धर्म म्हणतात.

हल्के हल्के पैगंबरसाहेबांच्या धर्मांत पुष्कळ अरब लोक येऊं लागले. ही गोष्ट मूर्तिपूजक पुजाऱ्यांना आवडेना. त्यांच्या मूर्तींची पूजा करण्यास कोणीच येईनासे झाल्यानें त्यांचें उत्पन्न बुडालें. पैगंबरावर ते खूपच चिडले. त्यांनीं त्याला ठार मारण्याचें ठरविलें. ही गोष्ट महंमदसाहेबांस समजतांच ते मक्केंतून पळून गेले. या पळण्याला मुसल्मानी भाषेंत ' हिजरा ' असें म्हणतात. महंमदसाहेब पळून गेले असें समजतांच कुरेशी लोक त्यांच्या पाठलागास निघाले. पाठलाग करणारे लोक जवळ येतांच महंमदसाहेब एका गुहेंत शिरले. पाठलाग करणारे त्या गुहेजवळ आले. परंतु गुहेच्या तोंडावर कोळ्यांचीं जाळीं व कबुतरें पाहून त्यांना वाटलें कीं, महंमद आंत गेला असता तर जाळीं मोडून गेलीं असतीं व कबुतरें उडून गेलीं असतीं. ते तसेंच पुढें गेल्यावर पैगंबरसाहेब बाहेर आले व मदिना नांवाच्या शहराकडे गेले. देवाच्या कृपेमुळेंच गुहेच्या तोंडावर अगदीं थोड्या वेळांत कोळ्यांनीं पुन्हां जाळीं विणलीं व कबुतरें येऊन बसलीं. नाहीं तर पैगंबरसाहेबांचे प्राण वांचलेच नसते.

म. ग्रं. सं. ठाणे.



मदिनेस गेल्यावर त्यांचा उपदेश पटून बरेच लोक मुसल्मानी धर्मात येऊं लागले. मुसल्मानी धर्माचा हा उत्कर्ष मूर्तिपूजक अरबांना सहन होईना. त्यांनीं मुसल्मान लोकांचा खूप छळ करण्यास सुरवात केली. आपल्या लोकांना विनाकारण छळ सोसावा लागतो हें पाहून महंदसाहेबांनीं त्यांना हातांत तल्वार घेऊन आपल्या शत्रूशीं लढण्यास सांगितलें. मुसल्मानांनीं अरबांचा पराभव करून अरबस्तानांतील सर्व मूर्ति फोडून टाकिल्या. अरब लोक मुसल्मानी धर्मांत आले.

मुसल्मानी धर्मांत सर्व लोकांची योग्यता सारखीच असल्यानें व त्या धर्मांतील विचार चांगले असल्यानें हळु हळु शेजारच्या देशांतहि तो पसरूं लागला. अरबस्तानच्या शेजारींच असलेल्या इराण देशाच्या खुस्रू राजास पैगंबरसाहेबांनीं मुसल्मानी धर्मांत येण्याबद्दल नम्रपणानें एक पत्र पाठविलें होतें. परंतु खुस्रूनें न वाचतांच तें रागारागानें फाडून टाकलें. ही गोष्ट

पैगंबरसाहेबांचें कानांवर जातांच ते म्हणाले, " ह्या गर्विष्ठ राजानें माझ्या पत्राचे जसे तुकडे केले, तसे देव त्याच्या राज्याचे करील. " पैगंबरसाहेबांचें हें भविष्य अगदीं खरें ठरलें. पुढें लवकरच मुसलमानांनीं खुश्रूचें राज्य जिंकिलें.

आपल्या डोळ्यांदेखतच मुसलमानी धर्माचा चोहींकडे होत असलेला प्रसार पाहून हा थोर सत्पुरुष इ. स. ६३२ मध्यें मरण पावला.

### प्रश्न

१ पैगंबर या शब्दाचा अर्थ काय ?

२ महंमदाचें पालनपोषण कोणी केलें ?

३ त्या काळची अरबस्तानांतली परिस्थिती कशी होती ?

४ लहानपणीं महंमदाच्या डोक्यांत कोणते विचार येत होते ?

५ महंमदाच्या लग्नाची माहिती सांगा.

६ महंमदानें कुरेशी लोकांना कोणता निर्णय सांगितला ? तो त्यांना कां आवडला ?

७ महंमदाला कोणता साक्षात्कार झाला ?

८ त्यांच्या उपदेशाचा सारांश सांगा.

९ शत्रूंच्या हातून महंमदाची कशी सुटका झाली ?

१० मुसलमानी धर्माचा प्रसार कसकसा झाला तें थोडक्यांत सांगा.

# ४ शंकराचार्य

गौतम बुद्धानें स्थापन केलेला बौद्ध धर्म सर्व हिंदुस्थानभर जोरानें पसरत चालला होता व आर्यांच्या हिंदु धर्माची पिछेहाट होत चालली होती. ह्याच सुमारास दक्षिण हिंदुस्थानांतील मलबार प्रांतांत शिवगुरु नांवाचा ब्राम्हण राहात होता. त्याच्या पत्नीचें नांव श्रीअंबिका असें होतें. शिवगुरु हा फार विद्वान व सद्वर्तनी होता. तीं दोघें नव्याबरोबर देवाचें भजन-पूजन करण्यांत व परोपकार करण्यांत काळ घालवीत होतीं.

अशा रीतीनें बराच काळ लोटला तरी त्यांना मुलबाळ कांहीं होईना. त्यामुळें तीं दोघेंहि उदास झालीं होतीं. त्यांच्या आयुष्यांतला आनंद पार नाहींसा झाला होता. मूलबाळ होण्यासाठीं देवाला तरी कांहीं नवस करून पहावा, असें त्यांना वाटूं लागलें.

त्यांचें राहाण्याचें गांव कालडी हें पूर्णा नदीच्या कांठीं होतें. नदीकांठीं शंकराचें एक प्रसिद्ध देऊळ होतें. तेथें जाउन तें जोडपें शंकराची मनोभावानें पूजा करूं लागलें. कांहीं दिवसांनंतर शंकर त्यांना प्रसन्न झाले. एके रात्रीं शिवगुरुच्या स्वप्नांत शंकर आले व म्हणाले, "तुमच्या भक्तीनें मी प्रसन्न झालों आहे. तुम्हांला थोडे दिवस जगणारा हुशार मुलगा हवा आहे कीं, फार दिवस जगणारा मंद बुद्धीचा मुलगा हवा आहे?" शिवगुरूनें देवाजवळ पहिल्या प्रकारच्या मुलाची मागणी केली. शिवगुरु जागा झाला. स्वप्न नाहींसें झालें. शंकरहि कोठें दिसेनात. झालेला वृत्तांत त्यानें पत्नीला सांगितला. तो ऐकून तिलाहि फार आनंद झाला.

शंकराच्या वराप्रमाणें कांहीं कालानंतर श्रीअंबिकेला एक देखणा मुलगा झाला. शंकराच्या कृपेमुळें हा मुलगा झाल्यामुळें त्याचें नांव शंकर असें

ठेवण्यांत आले. शंकर वर्ष दीड वर्षाचा झाला न झाला तोंच भरभर विद्या शिकूं लागला. तसें पाहिलें तर ह्या वयाच्या लहान मुलांना नीट बोलतां देखील येत नाहीं; आणि शंकर मात्र खडखडा धडे वाचूं लागला. ही त्याची हुशारी पाहून लोक आश्चर्यचकित होऊन जात.

वयाच्या चौथ्या वर्षीं त्याचे वडील मरण पावले. त्यानंतर त्याचें पालन-पोषण त्याची म्हातारी आई करूं लागली. तिनें त्याला विद्या शिकण्यासाठीं गुरूच्या घरीं ठेविलें. तेथें त्यानें हिंदु धर्माच्या ग्रंथांचा व संस्कृत भाषेचा अभ्यास केला. वयाच्या आठव्या वर्षींच त्यानें मोठ्या विद्वान् पंडितांइतकी विद्या संपादन केली. एवढेंच नव्हे तर मोठमोठे विद्वान् लोकसुद्धां ज्ञानाच्या बाबतींत त्याच्यापुढें फिके पडूं लागले. अभ्यास संपवून घरीं परत आल्यानंतर हिंदु धर्माचा उत्कर्ष करण्याचा आपण आयुष्यभर प्रयत्न करावयाचा असा बेत त्यानें केला. ह्या कामासाठीं लग्न न करतां आयुष्यभर संन्यासी बनावें लागणार होतें. मुलाचा हा बेत आईस पसंत पडणें शक्य नव्हतें. तिला असें वाटत होतें कीं, आतां आपल्या मुलाचें लग्न करून टाकावें. तो सुखानें संसार करीत आहे असें पाहिलें कीं, आपल्या डोळ्यांचें पारणें फिटेल. आपल्या एकुलत्या मुलानें संन्यासी व्हावें ही गोष्ट कोणत्या प्रेमळ आईस आवडेल बरें? अर्थातच शंकरची आईहि त्याला संन्यास घेऊं देईना.

एके दिवशीं शंकर नेहमींप्रमाणें पूर्णा नदीवर स्नानास गेला. खोल डोहांत पोहत असतां एका मगरीनें त्याचा पाय पकडला. त्यानें पुष्कळ झटापट केली. परंतु मगर त्याचा पाय सोडीना. त्याचा आरडाओरड ऐकून नदीच्या तीरावर पुष्कळ माणसें जमलीं. परंतु त्याच्या मदतीस जाण्याची कोणाचीच छाती होईना.

श्रीअंबिकादेवी तर बोलून चालून त्याची आईच! आपला मुलगा आतां वांचत नाहीं असें पाहून ती मोठमोठ्यानें रडूं लागली. तेवढ्यांत

नदींतून शंकर तिला म्हणाला, " आई, जर संन्यास घेण्यास तूं मला परवानगी देण्याचें कबूल करीत असशील तर मगर माझा पाय सोडील. "



आईनें ती गोष्ट कबूल केली, आणि आश्चर्य असें कीं मगरानें शंकरचा पाय सोडला.

आईची कशीतरी समजूत घालून शंकर संन्यास घेण्यासाठीं घराच्या बाहेर पडला. योग्य अशा गुरूजवळून संन्यास घ्यावा लागत असे. त्याप्रमाणें गुरूचा शोध करीत फिरत फिरत तो नर्मदा नदीच्या कांठीं आला. तेथें गोविंदनाथ नांवाच्या सत्पुरुषाचा आश्रम होता. आश्रमाभोंवतीं सुंदर अशीं फुलझाडें व फळझाडें होतीं. त्यांचा मधुर वास हवेंत चोंहीकडे पसरला होता. शेजारीं नर्मदा नदीचें स्वच्छ पाणी खळखळ आवाज करीत वाहात होतें. त्या सुंदर देखाव्यानें शंकरचें मन भारून टाकिलें. तो आश्रमांत शिरला. गोविंदनाथांची प्रसन्न मुद्रा व अगाध ज्ञान पाहून त्यांनाच गुरू करण्याचें त्यानें ठरविलें. शंकरसारख्या हुशार

व विद्वान् मुलाला गुरू गोविंदनाथांनीं मोठ्या आनंदानें आपला शिष्य बनविलें. गोविंदनाथांना हिंदु धर्माचा फार अभिमान होता व त्याचा उत्कर्ष होण्याचा प्रयत्न ते एकसारखा करीत होते. परंतु त्या वेळीं चहूंकडेच खूप गोंधळ माजला असल्यामुळें त्यांच्या प्रयत्नास चांगलें यश येईना. बौद्ध धर्मामुळें मूळच्या हिंदु धर्मांतील यज्ञांत घडणारी प्राण्यांची हत्या ( जनावरांना ठार मारणें) बंद झाली होती. पण पुढें पुढें बौद्ध धर्माचे लोकसुद्धां ढोंगी बनले. शिवाय ह्याच सुमारास कांहीं लोक देवी व भैरव ह्या देवांची पूजा करूं लागले. ह्या देवतांचे भक्त आपल्या देवतांना खूष करण्यासाठीं जनावरांचेच नव्हेत तर माणसांचे देखील बळी ( ठार मारून देवाला नैवेद्य दाखविणें ) देऊं लागले व दारू पिऊं लागले. आणि गंमत अशी कीं, ह्या वाईट गोष्टी देवांना आवडतात अशी ह्या भक्तांची कल्पना ! असे किती तरी धर्मपंथ त्या वेळीं सुरूं झाले होते. धर्माचें खरें ज्ञान सामान्य लोकांना नसल्यामुळें खुळ्या समजुतींनाच ते धर्म समजत होते.

शंकरासारखा हुशार शिष्यच ह्या खुळ्या लोकांना खऱ्या हिंदु धर्माची समजूत देऊं शकेल अशी गोविंदनाथांची खात्री पटली. यासाठीं त्यांनीं त्याला संन्यासाची दीक्षा दिली व हिंदुधर्माच्या प्रसारासाठीं देशभर फिरण्यास सांगितलें. गुरुंना नमस्कार करून शंकर आपल्या कामगिरीवर निघाला.

त्याच्यापुढें केवढें कठीण काम होतें तें पाहा. निरनिराळ्या धर्मपंथांतील मोठमोठ्या विद्वान् पंडितांना जिंकून त्याला हिंदुधर्माचा मोठेपणा त्यांना पटवून द्यावयाचा होता. आणि हें अवघड काम करणाऱ्या बाळाचें वय किती ? तर अवघें नऊ दहा वर्षांचें. परंतु त्याचें अगाध ज्ञान पाहून लोक त्याला शंकराचार्य असें म्हणूं लागले.

गुरूंचा आशिर्वाद घेऊन शंकराचार्य काशीस गेले. तेथें मोठमोठे पंडित होते. त्या सर्वांना त्यांनीं वादांत जिंकलें. शंकराचार्यांनीं त्यांना

असें पटवून दिलें कीं, "ईश्वर एकच आहे व सर्व प्राण्यांत त्याचा थोडाथोडा अंश आहे. आर्यांचे धर्मग्रंथ जे वेद त्यांत हेंच सांगितलें आहे; म्हणून वेदांत सांगितल्याप्रमाणेंच लोकांनीं वागावें." अशा रीतीनें ठिकठिकाणच्या पंडितांना जिंकीत जिंकीत ते पुढें जात असतां मंडणमिश्र नांवाच्या पंडिताशीं त्यांची गांठ पडली. आतांपर्यंत शंकराचार्यांनीं ज्यांना वादांत जिंकलें ते बौद्ध धर्माचे भक्त अथवा दैत्यांचे भक्त असे होते. परंतु मंडणमिश्र हा हिंदु धर्मांतीलच पंडीत होता. तो फार विद्वान् असल्यामुळें लोक त्याला फार मान देत होते. तेव्हां अशा मोठ्या पंडिताबरोबर वाद करणें हें सोपें काम नव्हतें.

मंडणमिश्राचें म्हणणें असें होतें कीं, देवाला प्रसन्न करण्यासाठीं मनुष्यानें यज्ञ करावेत, देवाची पूजा करावी व अनेक नैवेद्य द्यावा. मनुष्यानें संन्यास घेतल्यानें देव कधींच प्रसन्न होत नाहीं. उलट शंकराचार्यांचें असें मत होतें कीं, नुसत्या या गोष्टी केल्या म्हणजे देव प्रसन्न होतोच असें नाहीं. तर उतार वयांत मनुष्यानें संसार सोडून संन्यास घ्यावा व देवाचें ध्यान करावें. अशानें देव प्रसन्न होतो. दोघांपैकीं कोणाचें म्हणणें खरें आहे हें ठरविण्यासाठीं पंच नेमावा असें ठरलें. मंडणमिश्राची पत्नी सरस्वती ही फार विद्वान् स्त्री होती. तिला पंच नेमण्यांत आलें. तिनें त्या दोघांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घातल्या व सांगितलें कीं ज्याची माळ अगोदर सुकून जाईल तो हरला असें समजावें. मग दोघांनींहि आपापलें म्हणणें पुढें मांडण्यास सुरवात केली. थोड्या वेळानें मंडणमिश्राची माळ सुकली. ठरल्याप्रमाणें तो वादांत हरला. नंतर तो शंकराचार्यांचा शिष्य बनला.

मंडणमिश्रासारख्या मोठ्या पंडिताला जिंकल्यामुळें शंकराचार्यांची कीर्ति हिंदुस्थानभर पसरली. त्यामुळें दुसऱ्या धर्मपंथांतील लोक हिंदु धर्मांत येऊं लागले. पुष्कळ लोक त्यांचे शिष्य बनून हिंदु धर्माची वाढ करूं लागले.

शंकराचार्यांची कीर्ति होण्यास आणखी एक गोष्ट घडली. काश्मीर प्रांतांत सरस्वतीचें एक मंदीर होतें. त्याचा दरवाजा बंद होता व आंत एक आसन होतें. लोकांची अशी समजूत होती कीं, जगांत सर्वांत विद्वान् मनुष्य असेल त्याच्याच हातून तो दरवाजा उघडला जाईल व त्यालाच त्या आसनावर बसतां येईल. बऱ्याच विद्वानांनीं प्रयत्न केले, पण ते फुकट गेले. आचार्यांनीं मात्र तो दरवाजा उघडला व ते त्या आसनावर जाऊन बसले.

आपला मृत्यू जवळ आला असें समजतांच या थोर पुरुषानें हिंदु धर्माच्या वाढीसाठीं शृंगेरीला एक आश्रम बांधिला व ते स्वतः हिमालयांत तीर्थयात्रेला गेले ते परत आलेच नाहींत. बत्तीस वर्षांच्या ल्हानशा आयुष्यांत त्यांनीं ही केवढी थोर कामगिरी केली !

### प्रश्न

१ शिवगुरूनें शंकराजवळ कोणत्या प्रकारच्या पुत्राची मागणी केली ?

२ शंकराचार्यांच्या बालपणच्या हुशारीचें वर्णन करा.

३ त्यांच्या आईनें त्यांना संन्यास घेण्याची परवानगी केव्हां व कां दिली ?

४ गुरु गोविंदनाथांनीं शंकराचार्यांना कोणत्या हेतूनें शिक्षण दिलें ?

५ त्यांच्या उपदेशाचें सार सांगा.

६ शंकराचार्यांनीं मंडणमिश्राचा कसा पराभव केला ? दोघांचे मुद्दे कोणते होते ?

७ शंकराचार्यांचा शेवट कसा झाला ?

म. ग्रं. स.

# ५ ज्ञानेश्वर

रानांत शेंकडों वृक्ष असतात. तथापि वाटेनें जाणाऱ्या वाटसरूचें तिकडे लक्ष जात नाहीं. त्याच अरण्यांत एकादा केवडा बहरलेला असतो. त्याच्या सुवासानें आसपासचें रान भरून जातें. वाटसरू मान वळवून त्या केवड्याच्या झाडाकडे बघतो. जगांत देखील त्या रानांतील शेंकडों वृक्षांप्रमाणें शेंकडों लोक जन्मास येतात आणि मरण पावतात. त्यांची आठवणदेखील मागें उरत नाहीं. परंतु त्या केवड्या-प्रमाणें एखादाच थोर मनुष्य होऊन जातो. त्याच्या कामगिरीनें जगाला उजळा मिळतो. त्याचें नांव जगांत अजरामर होतें. ज्ञानेश्वरांची काम-गिरी अशाचपैकीं आहे. आज सातशें वर्षें होऊन गेलीं तरी देखील प्रत्येक मंदिरांतून 'ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानराज माऊली' असा त्यांच्या नांवाचा जयघोष चालतो. ज्ञानेश्वरांचा अवतार बाविसाव्या वर्षी संपला; पण बावीस कल्पांत लोटून गेले तरी त्यांचें नांव काळाच्या प्रवाहावर तरंगत राहील.

ज्ञानेश्वरांच्या वडिलांचें नांव विठ्ठलपंत. ते पैठणजवळील आपेगांवचे राहाणारे. त्यांचें लग्न रुक्मिणीबाईशीं झालें होतें. आळंदी येथें रुक्मिणी-बाईचें माहेर होतें. विठ्ठलपंतांना सुरवातीपासूनच देवभक्तीचा ओढा होता. लग्नानंतर त्यांचें मन संसारांतून उडालें. कोणालाहि न विचारतां ते काशीस गेले. तेथें रामानंद नांवाचे एक विद्वान् संन्यासी राहात होते. आपलें लग्न झालें नाहीं, असें विठ्ठलपंतांनीं त्यांना खोटेंच सांगितलें. विठ्ठलपंतांचें सांगणें खरें वाटून त्यांनीं त्यांस संन्यासी बनविलें. विठ्ठलपंत रामानंदाजवळ अभ्यास करूं लागले.

पुढें कांहीं दिवसांनीं रामानंदस्वामी रामेश्वराच्या यात्रेला निघाले. फिरतां फिरतां ते आळंदीस आले. मंदिरांत त्यांचा मुक्काम होता. देवदर्शनास गेलेल्या रुक्मिणीबाईनीं स्वतःची हकीगत स्वामींना सांगितली. विठ्ठलपंतांनीं स्वतःचें लग्न न झाल्याचें खोटेंच सांगितलें, अशी स्वामींची खात्री झाली. रामेश्वरच्या यात्रेहून परत काशीस गेल्यावर त्यांनीं विठ्ठलपंतांना संसार करण्यास सांगितलें. कारण संसार केल्याशिवाय संन्यास घेऊं नये, असा त्या काळचा रिवाज होता.

विठ्ठलपंत आळंदीस येऊन संसार करूं लागले. त्यांना निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, असे तीन मुलगे व मुक्ताबाई नांवाची एक मुलगी अशीं अपत्यें झालीं. हीं सर्व मुलें फार हुशार व सद्गुणी निघालीं. लहानपणापासून त्यांना देवभक्तीचें वेड लागलें.

मुलगे मुंजीलायक झाले. आई-वडिलांना त्यांची मुंज करण्याचें ठरविलें. परंतु ब्राह्मण लोक त्या मुलांची मुंज करीनात. ते त्या मुलांना संन्याशाचीं मुलें असें म्हणूं लागले. इतकेच नव्हे तर सर्व ब्राह्मणांनीं विठ्ठलपंतांना जातीबाहेर टाकलें. विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई यांना या गोष्टीमुळें धक्का बसून तीं दोघें मरण पावलीं.

त्यानंतर आळंदीच्या ब्राह्मणांनीं विठ्ठलपंतांच्या मुलांना पैठणास जाण्यास सांगितलें. पैठण हें त्या काळीं प्रसिद्ध क्षेत्र असून त्या ठिकाणीं विद्वान् पंडीत राहात असत. पैठणांतील पंडितांनी जर हीं मुलें ब्राह्मणाचीं आहेत असा निकाल दिला, तर त्यांची मुंज करावी, असें ठरलें,

निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई हीं भावंडें पैठणास गेलीं. त्यांची विद्वत्ता व परमेश्वरासंबंधींचें ज्ञान पाहून पंडितांना फार अचंबा वाटला. असें सांगतात कीं, ज्ञानेश्वरानें त्या ठिकाणीं एका रेड्याकडून



वेदाचे मंत्र म्हणविले. हें सामर्थ्य पाहून लोकांची खात्री पटली कीं, हीं सर्व मुलें फार थोर योग्यतेचीं आहेत. लगेच विद्वान् पंडितांनीं तीं ब्राह्मणाचीं मुलें आहेत, असें त्यांना शुद्धिपत्र दिलें. त्यानंतर त्या मुलांच्या मुंजी झाल्या.

निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवांचे गुरू होत. त्यांनींच ज्ञानेश्वरांना विद्या शिकविली. ज्ञानेश्वर फार बुद्धिमान होते. त्यांनीं अगदीं लहान वयांत ज्ञानेश्वरी नांवाचा ग्रंथ लिहिला व कांहीं अभंगहि रचिले.

ज्ञानेश्वरांच्या वेळेपर्यंतीं धर्म व परमेश्वर या संबंधींचें ज्ञान संस्कृत ग्रंथांत होतें. ते ग्रंथ फक्त ब्राह्मण पंडितांनाच समजत असत. त्यांचा असा समज होता कीं, तें ज्ञान मराठी भाषेंतून सांगणें म्हणजे पाप होय. मराठी भाषा ही कनिष्ट ( हलक्या ) लोकांची भाषा आहे, असें त्यांना वाटे. ब्राह्मणा-शिवाय इतरांना धर्माचें ज्ञान मिळविण्याचा व देवाची भक्ति करण्याचा हक्क नाहीं, असें ह्या विद्वानांना वाटत असे.

ब्राह्मण समाजाकडून इतर लोकांचे हाल होत असत. स्वत: ज्ञानेश्वर व त्यांची भावंडें यांना हा अनुभव आलाच होता. त्यामुळें कनिष्ठ लोकांबद्दल ज्ञानेश्वरांना कळवळा वाटूं लागला. गीता या मुख्य संस्कृत ग्रंथांतील ज्ञान त्यांनीं मराठींत सोपें करून लोकांना सांगितलें. ज्ञानेश्वरी म्हणजे गीतेचा मराठी अवतार आहे. मनुष्यानें कसें वागावें, देवाची भक्ति कशी करावी वगैरे गोष्टी ज्ञानेश्वरींत सांगितल्या आहेत.

सर्व लोक सारख्या दर्जाचे आहेत; भक्ति केल्यानें देव कोणालाहि प्रसन्न होतो; मराठी भाषा देखील संस्कृत भाषेइतकीच गोड आहे; अशा प्रकारचा उपदेश करीत करीत ज्ञानेश्वर सर्व हिंदुस्थानभर हिंडले त्यांच्या-बरोबर नामदेव शिंपी इत्यादि इतर जातींचे साधुसंत देखील तीर्थयात्रा करीत हिंडले. पंढरीचा विठोबा हा या सर्व संतांचा मुख्य देव होय.

सर्व जातींत समानता मानणें विठ्ठलाची भक्ति करणें व सर्व प्राणी-मात्रांवर प्रेम करणें, असा ज्ञानेश्वरांचा उपदेश असे. यालाच भागवत धर्म किंवा वारकरी संप्रदाय असें म्हणतात. वरिष्ठ वर्गाच्या जाचाला कंटाळलेले हजारों लोक भागवत धर्मांत येऊन मिळाले. चोखामेळा महार, नामदेव शिंपी, गोरोबा कुंभार, रोहिदास चांभार, तुकाराम वाणी, एकनाथ ब्राह्मण हे निरनिराळ्या जातींचे संत ज्ञानेश्वरांच्या भागवत धर्मांत आले. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्ञानेश्वरांनीं समाजांतील जातिभेद मोडून हरिनामाची पेठ गोरगरीबांना खुली करून दिली. असें करीत असतांना संस्कृत पंडि-तांकडून त्यांचा पुष्कळ छळ झाला; परंतु त्याची पर्वा त्यांनीं केली नाहीं.

ज्ञानेश्वरांची कीर्ति चांगदेव नांवाच्या साधूच्या कानीं गेली. तो मोठा योगी होता. योग नांवाच्या विद्येच्या योगानें मोठमोठे चमत्कार करतां येतात. चांगदेवाला स्वत:च्या योगसामर्थ्याचा मोठा गर्व वाटत होता. आपलें सामर्थ्य दाखविण्यासाठीं तो आळंदीस जाण्यास निघाला. तो वाघावर

बसला होता व त्याच्या हातांत सर्पाचा चाबूक होता. त्याला वाटले हे पाहून ज्ञानेश्वर चकीत होऊन जातील. चांगदेव सामोरा आला त्या वेळीं ज्ञानेश्वर व त्याची भावंडें ऊनपहाळी घेत भिंतीवर बसलीं होतीं. चांगदेवास बघतांच ज्ञानेश्वरांनीं स्वतःच्या योगसामर्थ्यानें ती निर्जीव भिंत चालविली. तें पाहून चांगदेवाचा गर्व पूर्णपणें उतरला. त्याची खात्री झाली कीं, ज्ञानेश्वर देखील मोठे योगी व साधु आहेत.

ज्ञानेश्वरांनीं वयाच्या बाविसाव्या वर्षी जिवंतपणीं आळंदी येथें समाधि घेतली.

प्रश्न

१ विठ्ठलपंत रामानंदांजवळ खोटें कां बोलले ?
२ हा खोटेपणा कसा उघडकीस आला ? त्याचा काय परिणाम झाला ?
३ या चार भावंडांनीं पैठणास जाऊन काय केलें ?
४ कनिष्ठ लोकांबद्दल ज्ञानेश्वरांना कळवळा कां वाटूं लागला ?
५ त्या काळची परिस्थिति थोडक्यांत सांगा.
६ भागवत धर्म म्हणजे काय ? त्याचा प्रचार कोणकोणत्या संतांनीं केला ?
७ चांगदेवाचा गर्व कसा उतरला ?
८ ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाचें वैशिष्ट्य कोणतें ?

# ६ नामदेव

ज्ञानेश्वरांच्या काळीं नामदेव नांवाचा साधु होऊन गेला. त्यानें देखील गांवोगांवीं कीर्तनें करून भागवत धर्माचा प्रसार केला. नामदेवानें अभंगांच्या द्वारें लोकांना उपदेश केला.

नामदेवाचा जन्म पंढरपूर येथें एका शिंपी कुळांत झाला त्याच्या वडिलांचें नांव दामाजी शेट असें असून आईचें नांव गोणाई होतें. हीं दोघेंहि नवरा-बायको विठ्ठलाची भक्ति करीत असत. प्रथम विठ्ठलाला नैवेद्य दाखविल्याशिवाय तीं पति-पत्नी जेवत नसत.

एके दिवशीं दामाजी शेट कांहीं कामासाठीं परगांवीं गेले. त्यामुळें



विठ्ठलाला नैवेद्य दाखविण्याची पाळी नामदेवावर आली आईनें लहानग्या नामदेवाजवळ नैवेद्याचें ताट दिलें. तें घेऊन तो विठ्ठलाच्या मंदिरांत गेला.

देवापुढें नैवेद्य ठेवून त्यानें देवाची प्रार्थना केली. त्याच्या बालमनाला वाटलें कीं, देव दररोज नैवेद्य खात असावा. आजच त्याला रुसायला काय झालें? मूर्ति नैवेद्य खात नसते, ह्याची कल्पना त्या लहान मुलाला कोठून असणार? देवानें नैवेद्य खावा असा हट्ट तो भोळा, भावडा जीव धरून बसला. देवाला देखील कोडें पडलें. शेवटीं त्या बालभक्ताचा निश्चय व भक्ति पाहून विठ्ठलाच्या मूर्तीनें नैवेद्य खाऊन टाकला.

नामदेव रिकामें ताट घेऊन घरीं आला. देवानें नैवेद्य खाऊन टाकला असें त्यानें आईला सांगतांच तिला आश्चर्य वाटलें. दामाजीशेट गांवाहून परत आल्यावर तिनें ती गोष्ट त्यांना सांगितली. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं नामदेवाला नैवेद्य घेऊन जाण्यास सांगितलें. मुलाच्या म्हणण्याचा खरेपणा पहाण्यासाठीं ते गुपचुप त्याच्या मागून देवळांत गेले. देवाच्या मूर्तीनें नामदेवाचा नैवेद्य आनंदानें खाल्ला. आपला मुलगा खरें बोलणारा विठ्ठलभक्त आहे हें पाहून दामाजीशेटना फार आनंद वाटला.

नामदेव थोडा मोठा झाल्यावर राजाई नांवाच्या मुलीबरोबर त्याचें लग्न लावण्यांत आलें. नामदेवानें आतां संसारप्रपंच करूं लागावें अशी बापाची इच्छा होती. विठ्ठलभक्तीच्या नादांत नामदेवाला बापाच्या कापडाच्या दुकानदारीचा व्यवहार जमेना. या बाबतींत एक फार गमतीची गोष्ट घडली.

एकदां एक लबाड गिऱ्हाइक नामदेवाच्या दुकानीं आलें. त्यानें बऱ्याच किंमतीचें कापड उधार घेतलें व थोड्याच दिवसांनीं कापडाचे पैसे देण्याचा वायदा केला. अशा प्रकारच्या व्यवहारांत कित्येक वेळां पैसे मिळेपर्यंत कांहीं मौल्यवान वस्तु गहाण ठेवण्याची अथवा एकाद्या वजनदार मनुष्याला जामीन देण्याची पद्धति असते. त्या पद्धतिप्रमाणें कापडाचे पैसे फिटेपर्यंत एक वजनदार धोंडा जामीन म्हणून त्या लुच्च्या

गिऱ्हाईकानें नामदेवाच्या ताब्यांत दिला ! ठरलेल्या मुदतींत गिऱ्हाइकानें पैसे न दिल्यास ते त्या वजनदार धोंड्याकडून वसूल करावयाचे, असें ठरलें. दिवसामागून दिवस निघून गेले; ते लबाड गिऱ्हाईक दुकानाकडे एकदांहि फिरकलें नाहीं. धोंडोपंताला मात्र पैसे देण्याची काळजी दिसली नाहीं. विचारा दगडच तो ! तो कसला पैसे देणार ? भोळा नामदेव मात्र गिऱ्हाइकाच्या लबाडीनें फसला.

पुढें नामदेव ज्ञानेश्वरांच्या बरोबर हिंदुस्थानभर तीर्थयात्रा करीत हिंडला. काशी, प्रयाग, हरिद्वार, द्वारका, बद्रिकेदार, जगन्नाथपुरी, रामेश्वर, इत्यादि क्षेत्रें पाहून ते गोरोबा कुंभार नांवाच्या साधूच्या घरीं मुक्कामाला आले. तेथें बरीच संतमंडळी जमली होती. कोणीतरी गंमतीनें गोरोबास म्हटलें, " या ठिकाणीं जमलेले सर्व लोक पूर्णपणें साधुत्वास पोंचले कीं नाहीं हें ओळखा. " गोरोबाचा धंदा मडकीं घडण्याचा. त्यानें लागेच मडकीं



घडण्याचें थापटणें हातीं घेऊन जमलेल्या संतांच्या डोक्यावर थापटण्यास

सुरवात केली. नामदेवाच्या डोक्यावर थापटणें पडतांच तो रागावला. गोरोबा म्हणाले. " हें मडकें ( डोकें ) कच्चें आहे. खऱ्या साधुला राग, लोभ इत्यादि भावना शिवूं शकत नाहींत. नामदेवाला राग येऊं शकला म्हणून हा अद्याप पूर्णपणें साधुत्वास पोहोचला नाहीं. "

पूर्ण ज्ञान होण्यासाठीं गुरूची जरूरी असते. त्याप्रमाणें इतर संतांच्या सांगण्यावरून नामदेवानें विसोबा खेचर नांवाच्या साधूला गुरू करावयाचें ठरविलें. विसोबा खेचर औंढ्या नागनाथ या गांवीं राहात होते. औंढ्या नागनाथ नांवाचें महादेवाचें मंदीर त्या गांवात होतें. नामदेव ज्या वेळीं गांवांत शिरला त्या वेळीं विसोबा खेचर नागनाथाच्या देवळांत होते. म्हणून तो देवळांत गेला. एक महारोगी महादेवाच्या पिंडीवर पाय टाकून झोपला आहे. असें त्याला दिसलें. हा देवाचा अपमान पाहून त्याला फार वाईट वाटलें. तो म्हणाला, " म्हातारेबाबा, देवाच्या पिंडीवर पाय टाकून तुम्ही खुशाल झोंपतां याचें तुम्हाला कांहींच वाटत नाहीं काय ? " म्हातारा ( विसोबा ) म्हणाला, " बाळ, मी काय करूं ? मी म्हातारा झालों आहे. माझ्याच्यानें पाय उचलवत नाहींत. तूं उचलून ठेवशील तर उपकार होतील. "

म्हाताऱ्याच्या सांगण्याप्रमाणें नामदेवानें त्याचे पाय पिंडीवरून उचलून खालीं ठेविले. तोंच काय आश्चर्य ! म्हाताऱ्याच्या पायांखालीं दुसरी पिंड तयार झाली. नामदेवानें बऱ्याच ठिकाणीं विसोबाचे पाय उचलून ठेविले. परंतु प्रत्येक ठिकाणीं पायांखालीं नवीन पिंड तयार होऊं लागली.

हा सर्व प्रकार पाहून नामदेव भांबावून गेला. नंतर विसोबानें त्याची खात्री पटविली कीं, देव कांहीं फक्त देवळांतच नाहीं. तो सर्व जगांत भरून राहिला आहे. देव नाहीं अशी थोडीसुद्धां जागा जगांत नाहीं.

आणि म्हणूनच नामदेवानें विसोबाचे पाय कोठेंहि ठेविले, तरी तेथें महादेवाची पिंड तयार होत असे.

अशा रीतीनें पूर्णपणें साधुत्वास पोंहोचल्यावर नामदेवानें ठिकठिकाणीं कीर्तनें करून भागवत धर्माचा प्रसार केला. नामदेवानें पंढरपूर येथें समाधि घेतली. पंढरीस जाणारे भाविक वारकरी आजदेखील भक्तिभावानें या समाधीस वंदन करतात.

प्रश्न

१ लबाड गिन्हाइकानें नामदेवाला कसें फसविलें तें थोडक्यांत लिहा.

२ नामदेव गोरोबा कुंभारावर कां रागावले ? गोरोबांनीं त्यांना कोणता धडा शिकविला ?

३ नामदेव विठोबा खेचरांपासून काय शिकले ?

४ ज्ञानेश्वरांच्या कार्यांत नामदेवांनीं कोणती मदत केली ?

---

# ७ सांवता माळी

मीराबाई नांवाची एक साध्वी स्त्री राजपुतान्यांत होऊन गेली. ती गोपाळ कृष्णाची भक्ति करीत असे. देवाच्या प्राप्तीसाठीं शरीरिक कष्ट करणाऱ्या साधूंबद्दल तिनें असें लिहिलें आहे. ' कंदमुळें, गवत व फळें खाण्यामुळें देव भेटूं शकला असता तर तो वानरें व हरणें यांना भेटला असता. पाण्यांत उभें राहिल्यामुळें देव भेटता, तर तो माशांना भेटला असता; ' सारांश काय कीं, शरीराला खूप शीण देऊन देव मिळतो ही कल्पना चुकीची आहे. मनुष्यानें देवाची मनापासून भक्ति केली, सर्व प्राणीमात्रांवर प्रेम केलें व चांगली वागणूक ठेवली कीं देवाची

प्राप्ति होते. तेवढ्यासाठीं अंगाला राख फासून व भगवे कपडे पेहरून गुहेंत व रानावनांत जावयास नको. संसारांत राहूनहि देव प्राप्त करून घेतां येतो. ही गोष्ट संत सांवतोबा माळी यांच्या चरित्रावरून स्पष्टपणें कळून येईल.

पंढरपूरनजिक अरणभेंडी नांवाचें गांव आहे. या गांवीं सांवतोबाचा जन्म इ.स. १२५० मध्यें झाला. त्यांच्या वडिलांचें नांव परसू व आईचें नांव नांगितावाई. जातीनें माळी असल्यामुळें भाजीपाला लावून आलेल्या उत्पन्नावर ते आपला चरितार्थ चालवीत . असत.

सांवतोबा ल्हानपणीं मळ्यांत खपून आईबापांना कामधंद्यांत मदत करीत असत. परसूबांना देवभक्तीचा नाद असल्यानें सांवतोबांना ल्हानपणा-पासूनच विठ्ठलाच्या भक्तीची गोडी लागली.

पुढें योग्य वेळीं सांवतोबाचें लग्न जनाबाई नांवाच्या मुलीशीं झालें. आई-वडील मरण पावल्यावर संसाराची सर्व जबादारी सांवतोबांवर पडली. मळ्यांत जाऊन काम करावें, भाजीपाला पिकवावा व आलेल्या उत्पन्नावर पोट चालवावें असा त्यांचा क्रम होता. शेतावरचीं कामें करतांना ते विठ्ठलाचें भजन करीत. त्यांच्या शेतांतील मुळा, भाजी, मिरची या प्रत्येक वस्तूंत श्री विठ्ठल भरला आहे असें त्यांना वाटे. रात्रींच्या वेळीं सांवतोबा कीर्तन करीत. कीर्तन व उपदेश करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांस आहे, असें कर्मठ ब्राम्हणांचें मत होतें. सांवतोबा कीर्तन करतो ही गोष्ट त्यांना आवडेना. त्यांना त्रास देण्यासाठीं कर्मठ ब्राह्मणांनीं त्यांचा मळा व झोपडी पेटवून दिली. सोन्यासारख्या मळ्याची राखरांगोळी झाली ! परंतु सांवतोबा डगमगले नाहींत.

त्यांनीं विहीर खणावयास सुरवात केली. त्या वेळीं पंढरपूरची जत्रा होती. लोकांची दिंडी पंढरपूरच्या रस्त्याला लागली होती. टाळ—मृदुंगांच्या आवाजानें 'आकाश भरून गेलें होतें. कांहीं कर्मठ ब्राह्मण म्हणाले,

"लोकहो, पहा तो सांवत्या. देवाचा भक्त म्हणवितो आणि पंढरपूरला जात नाहीं. पहा, कसा ढोंगी व लबाड आहे." सांवतोबांनीं शांतपणे लोकांना उत्तर केलें, "बाबांनो, श्रीविठ्ठल कांहीं फक्त पंढरपुरांतच नाहीं. तो माझ्या शेतांत आहे. सर्व जगांत भरून उरलेला आहे. माझ्या मळ्यांतील प्रत्येक वस्तूंत मला श्रीविठ्ठल दिसतो. त्याच्याच आज्ञेप्रमाणें मी माझ्या वांट्यास आलेलें मळा पिकविण्याचें काम करीत आहे. मग मी पंढरीस कशासाठीं येऊं? देवानें नेमून दिलेलें काम सोडून मी कसा बरें येऊं? त्यामुळें देवाला राग नाहीं कां येणार?" लोक खो खो करून हंसले व रस्ता चालूं लागले.

इकडे सांवतोबाचें विहीर खणण्याचें काम सुरूं झालें. पहारींचा खणखणाट व सुरुंगांचा दणदणाट सुरूं झाला. गांवचे लोक म्हणूं लागले. "सांवतोबा वेडा आहे. अहो, खडकाशीं टक्कर देऊन कां कांहीं फायदा होणार आहे? डोकें मात्र फुटावयाचें. त्या खडकाळ जागीं कां पाणी लागणार आहे?" लोकांच्या म्हणण्याकडे सांवतोबांनीं मुळींच लक्ष दिलें नाहीं. आपलें काम त्यांनीं चालूंच ठेविलें. उद्योगी मनुष्याला देव नेहमींच मदत करतो. शेवटीं काळ्याकभिन्न अशा त्या खडकांतून मोत्यासारख्या पाण्याचे फवारे उडूं लागले. स्फटिकासारख्या शुभ्र पाण्यानें विहीर तुडुंब भरली. थोड्याच दिवसांत सांवतोबाचा मळा पांचूसारख्या हिरव्यागार भाजीपाल्यानें व सोन्यासारख्या पिवळ्याधमक कणसांनीं फुलून गेला. उद्योग हाच परमेश्वर!

त्यानंतर सांवतोबा तीर्थयात्रा करण्यासाठीं ज्ञानदेव, नामदेव इत्यादि संतांबरोबर सर्व हिंदुस्थानभर फिरले. अशी एक आख्यायिका सांगतात कीं, परमेश्वर सर्व ठिकाणीं भरलेला आहे, असें लोकांना पटविण्यासाठीं सांवतोबांनीं खुरप्याच्या घावानें आपलें पोट फाडलें. लोक पहातात तो सांवतोबाच्या पोटांत विठ्ठलाची मूर्ति उभी!

ही दंतकथा खरी असो अथवा खोटी असो. सांवतोबांच्या चरित्रावरून एवढें मात्र दिसून येतें कीं, परमेश्वराच्या प्राप्तीसाठीं वैरागी बनण्याचें कांहींच कारण नाहीं. सदाचरण, सद्विचार व सत्कर्म यायोगें परमेश्वर प्रसन्न होतो.

**प्रश्न**

१ मीराबाईनीं कोणतें तत्वज्ञान सांगितलें आहे ? तें या गोष्टींत कसें लागू पडतें ?

२ ब्राह्मणांनीं सांवता माळ्याचा छळ कां केला ?

३ सांवता माळी पंढरपूरला कां गेला नाहीं ?

४ ' उद्योग हाच परमेश्वर ' हें सांवतोबांनीं कसें सिद्ध केलें ?

५ संत नामदेव व संत सांवता यांच्यामध्यें तुलना करा.

---

# ८ एकनाथ

उन्हाळा मी म्हणत होता. डोक्यावर आलेला सूर्य जमीनीवर आग पाखडीत होता. अशा समयीं पैठण गांवाजवळच्या गंगेच्या ( गोदावरीच्या ) वाळवंटांत एक लहान मूल मोठमोठ्यानें रडत होतें. त्याची आई पाण्याची खेप घेऊन केव्हांच गेली होती. आपलें बाळ आपल्या पाठीमागें नदीवर आलें असेल, याची त्या बिचारीला कल्पनादेखील नव्हती.

तापलेल्या वाळवंटांत त्या मुलाचे पाय भाजून निघत होते; वरून पडणाऱ्या उन्हाच्या आगीनें अंग तापून गेलें होतें; व डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंनीं व घामानें शरीर भिजून चिंब झालें होतें. नदीवर जाणारीं येणारीं माणसें त्याच्याकडे बघत व पुढें चालूं लागत. कुणी देखील त्याला उचलून घेईना. कुणाला देखील त्याची दया येईना. कारण तें पडलें महाराचें मूल. अगदींच ओंगळवाणें व कळेंमळें !

गंगेवर स्नान आटोपून त्या रस्त्यानें एक ब्राह्मण घराकडे जात होता. त्या मुलाची स्थिति पाहून त्याचें अंतःकरण कळवळलें. त्यानें त्याला उचलून घेतलें व घरीं नेलें; त्याला न्हाऊं घालून त्याचें अंग स्वच्छ केलें आणि नंतर महारवाड्यांत जाऊन त्यानें तें मूल त्याच्या आईच्या स्वाधीन केलें. मी ब्राह्मण असून महाराच्या मुलाला कसा शिवूं, असा विचार देखील त्याच्या मनांत आला नाहीं. त्याच्या दृष्टीनें ब्राह्मण आणि महार एवढेच नव्हेत तर सर्वच प्राणीमात्र सारख्याच दर्जाचे होते. सर्वजण एकाच परमेश्वराचीं लेंकरें होत. समानतेची शिकवण स्वतःच्या वागणुकीनें लोकांना पटवून देणाऱ्या या थोर ब्राह्मणाचें नांव एकनाथ असें होतें.

एकनाथाचा जन्म पैठण या गांवीं झाला. त्यांच्या वडिलांचें नांव सूर्यनारायण असें असून आईचें नांव रुक्मिणीबाई असें होतें. एकनाथांचीं मातापितरें लहानपणींच वारल्यामुळें त्याचा सांभाळ आजोबा चक्रपाणी यांनीं केला.

पैठण येथें थोडा विद्याभ्यास करून एकनाथ जनार्दनस्वामींकडे गेले. ते विद्वान् असून देवगडावर नोकरी करीत होते. त्यांनीं एकनाथांना पुष्कळ ज्ञान दिलें. संसारांत राहूनहि देव प्रसन्न करून घेतां येतो, असा उपदेश त्यांनीं एकनाथांना दिला.

गुरूची आज्ञा घेऊन एकनाथ हिंदुस्थानांतील तीर्थें पहात पहात पैठणास आले. बऱ्याच वर्षांनीं घरीं सुखरूप आलेल्या नातवाला पाहून नाथांच्या आजोबांचें काळीज आनंदानें फुलून गेलें. पुढें गिरिजाबाई नांवाच्या मुलीशीं नाथांचें लग्न झालें. नाथांच्याप्रमाणें गिरिजाबाई शांत स्वभावाची व थोर मनाची बाई होती. प्रत्येक सत्कार्यांत एकनाथांना ती मनोभावानें मदत करीत असे.

एकनाथांच्या साधुत्वाविषयीं पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत.

एकदां नाथांच्या घरीं वडिलांचें श्राद्ध होतें. तयार होत असलेल्या पक्वानांच्या घमघमाटानें गल्ली भरून गेली होती. गल्लीनें जाणाऱ्या महारांच्या तोंडाला त्या सुवासानें पाणी सुटलें. आपल्याला कोठून असलें सुग्रास अन्न मिळणार, असें ते आपसांत बोलूं लागले. नाथांच्या कानीं ते शब्द पडतांच त्यांनीं सर्व महारवाडा बोलावून आणिला व श्राद्धाचें अन्न त्या लोकांना खाऊं घातलें. श्राद्धासाठीं परत दुसरें अन्न तयार होऊं लागलें. अन्न तयार झाल्यावर नाथांनीं ब्राह्मणांना बोलाविलें. परंतु ते येईनात. ब्राह्मणांच्या अगोदर महारांना जेऊं घालणाऱ्या एकनाथाला ते धर्मबुडव्या असें म्हणूं लागले. असें सांगतात कीं, जेव्हां ब्राह्मण येईनात तेव्हां सर्व ब्राह्मणांचे स्वर्गांतील आजे-पणजे खालीं आले व नाथांच्या घरीं एका पंक्तींत जेवण करूं लागले. हा देखावा पाहून नाथांच्या थोरपणाविषयीं ब्राह्मणांची खात्री पटली.



एकदां एकनाथ नदीवरून स्नान करून येत होते. त्याच रस्त्याजवळ एक मुसलमान राहात होता. नाथांना त्रास देण्यासाठीं तो त्यांच्या

अंगावर थुंकला. नाथ मुळींच रागावले नाहींत. ते परत नदीवरून स्नान करून आले. परत तो मनुष्य त्यांच्या अंगावर थुंकला. नाथांनीं स्नान करून यावें व त्या दुष्टानें त्यांच्या अंगावर थुंकावें, असा प्रकार कितीतरी वेळ चालला होता. शेवटीं तो दुष्ट मनुष्य हरला. नाथ मात्र शांतीचे सागर. आपणांस यानें आज खूप वेळां पवित्र गंगेचें स्नान घडविलें म्हणून न रागावतां त्यांनीं त्याला धन्यवाद दिले.

नाथांच्या साधुत्वाची परीक्षा पहाण्यासाठीं गांवांतील कुटाळ लोकांनीं एका ब्राह्मणास त्यांच्याकडे पाठविलें. त्यानें जर नाथांना राग आणविला तर ते लोक त्याला दोनशें रुपये देणार होते. नाथांनीं ब्राह्मणाचें स्वागत करून त्याला स्वतःच्या पंगतीला जेवयास बसविलें. गिरजाबाई वाढीत असतां ब्राह्मण उठून टुणदिशी तिच्या पाठीवर बसला. परंतु नाथांना राग न येतां ते पत्नीला म्हणाले, " संभाळ हं, बाळ पाठीवरून खालीं पडेल. " नाथांची शांत वृत्ति पाहून ब्राह्मण शरमला. ब्राह्मणानें असें कां केलें हें समजतांच नाथांना फार वाईट वाटलें. ते म्हणाले, " मला अगोदर असें समजलें असतें तर मी मुद्दाम रागावलों असतों व तुम्हांला दोनशें रुपये मिळाले असते."

एकदां नाथांच्या घरांत रात्रीं चोर शिरले. ही गोष्ट नाथांच्या ध्यानांत येतांच त्यांनीं चोरांना घरांतील भांडीकुंडीं व दागदागिने काढून दिले. चोरी करण्याच्या उद्योगानें ते दमले असतील असें समजून त्यांनीं त्यांना जेवण देखील दिलें. बिचारे चोर लाजले व तेव्हांपासून सन्मार्गानें वागूं लागले.

एकदां तर नाथ महाराच्या घरींदेखील जेवले. सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणीं देव असतो व सर्वांची योग्यता सारखी असते, हें भागवत धर्माचें तत्त्व एकनाथांनीं स्वतःच्या आचरणानें लोकांना पटवून दिलें.

एकनाथांनीं भागवत या संस्कृत ग्रंथांतील उपदेश मराठींत आणला. तो एकनाथी भागवत म्हणून प्रसिद्ध आहे. त्या काळचे संस्कृत पंडित मराठी

भाषेला तुच्छ लेखीत असत. पैठणच्या पंडितांशीं व काशीच्या शास्त्र्यांशीं वादविवाद करून नाथांनीं मराठीची थोरवी त्यांना पटवून दिली.

### प्रश्न

१ संत एकनाथ यांच्या चांगुलपणाच्या दोन गोष्टी सांगा.

२ जनार्दनस्वामींनीं एकनाथांना कोणता उपदेश दिला ?

३ गांवकऱ्यांनीं त्यांच्या साधुत्वाची परीक्षा कशी घेतली ? शेवटीं काय झालें ?

४ एकनाथांच्या उपदेशाचें सार कोणतें ?

५ संत ज्ञानेश्वर व संत एकनाथ यांची तुलना करा.

---

## ९ तुकाराम

पुण्याजवळ देहू नांवाचें एक गांव आहे. त्या सालीं देहू गांवचें शिवार सोन्यासारख्या पिकांनीं फुलून गेलें होतें. हिरव्यागार ताटांवर मोत्यांच्या घोंसांप्रमाणें घोंसदार कणसें डुलत होतीं. जणुं काय हिरव्या साड्या नेसून मोत्यांनीं भरलेलीं ताटें घेऊन उभ्या असलेल्या सुवासिनीच ! पिकाच्या मध्यभागीं माळा होता. त्याच्यावर एक रखवालदार उभा होता. त्याच्या हातांत गोफण नसून टाळ व चिपळ्या होत्या. टाळ-चिपळ्यांच्या मंजुळ आवाजाच्या तालावर तो विठ्ठलाचें भजन करीत होता. त्याला जरी पांखरें हांकण्यासाठीं ठेविलें होतें तरी त्यानें तें निर्दयपणाचें काम केलें नाहीं. त्याला त्या भरारणाऱ्या गोजिरवाण्या, चिमण्या जीवांची दया आली. मालकाचें शेत त्यानें पाखरांना खुशाल खाऊं दिलें.

मालकाला वाटलें, आपण प्रामाणिक रखवालदार ठेविला आहे. आतां शेतांत भरपूर दाणे येतील. परंतु तो शेतांत येऊन पहातो तों सर्व शेत

उजाड ! तो रखवालदाराला खूप बोलला. परंतु त्याला मालकाच्या बोल-ण्याचा मुळींच राग आला नाहीं. त्या गरीब पाखरांच्या तोंडचा घास आपण काढिला नाहीं, या गोष्टीचें त्याला समाधान वाटत होतें. हा दयाळू रखवालदार म्हणजेच प्रसिद्ध साधु तुकाराम महाराज हे होत.

तुकारामाचा जन्म देहू येथें इ. स. १६०८ मध्यें झाला. त्यांच्या वडिलांचें नांव बोल्होबा असून आईचें कनकाबाई असें होतें. बोल्होबा मोरे यांचें किराण्याचें दुकान होतें; शिवाय थोडी शेती व सावकारकीहि होती.

तुकारामाचें थोडें शिक्षण आटोपल्यावर त्या वेळच्या वहिवाटीप्रमाणें त्याचें लग्न झालें. बायको दम्याच्या रोगानें नेहमीं आजारी पडूं लागल्यामुळें बोल्होबांनीं तुकारामाचें दुसरें लग्न केलें. दुसऱ्या बायकोचें नांव जिजाई असें होतें. ती फार भांडखोर व बडबडी होती.

थोड्याच दिवसांत तुकारामाचे आईबाप वारले. दुकानच्या व्यव-हाराचा व संसाराचा सारा भार त्याच्यावर पडला. नेहमीं विठ्ठलाच्या भजनांत रंगून गेल्यामुळें दुकानाकडे तुकारामाचें दुर्लक्ष होऊं लागलें. शेतीसावकारकीचें उत्पन्नहि कमी येऊं लागलें. जिजाईला ही गोष्ट कशी आवडणार? ती पडली पक्की व्यवहारी बायको. तिनें नवऱ्याची व त्याच्या विठ्ठलाची देखील चांगलीच खरडपट्टी काढली. परंतु तुकारामाचें विठ्ठलभजन कांहीं सुटलें नाहीं.

पुढें देशांत मोठा दुष्काळ पडला. धान्याची धारण खूपच कडाडली. अन्नान्न करीत लोक मरूं लागले. वैरणचाऱ्यावांचून गुरेंढोरें पटापट मरूं लागलीं. याच तडाख्यांत तुकारामाची पहिली बायको व मुलगा हीं दोघें मरण पावलीं. गोठ्यांतील जित्रापें चाऱ्यावांचून दावणीलाच मरून पडलीं. या गोष्टी पाहून तुकारामाचें मन संसारांतून अजिबात उडालें. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, नामदेवाचे अभंग इत्यादि ग्रंथांचा अभ्यास

करुन विठ्ठलाची भक्ति करावी, एवढा एकच धंदा आतां त्याला उरला. अंगाला राख फासून वैराग्याप्रमाणें तो रानावनांत पळून गेला नाहीं; तर साध्यासुध्या माणसाप्रमाणें पोटापाण्याचा थोडाफार उद्योग करूनच त्यानें विठ्ठलाची भक्ति केली. दुष्काळानंतर तुकारामाजवळ कांहीं देखील उरलें नाहीं. पण त्यानें कोणाजवळ भीक मागितली नाहीं. भिक्षा मागणें हें तो पाप समजत असे. सुरवातीस दिलेल्या प्रसंगावरून कल्पना येईल कीं, पोटासाठीं कष्ट करण्यांत तो कमीपणा मानीत नसे.

बाबाजी चैतन्य नांवाच्या एका साधूनें तुकारामाच्या स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, "तूं कविता करून लोकांना उपदेश कर." त्याप्रमाणें तुकारामानें अभंग रचून लोकांना उपदेश करावयास सुरवात केली.

त्या काळीं महाराष्ट्रांत अहमदनगर, विजापूर, गोंवळकोंडा इत्यादि ठिकाणीं मुसलमानीं राज्यें होती. मुसलमानांकडून हिंदु धर्मांतील लोकांवर जुलूम होत होता. त्यामुळें लोक त्रासून गेले होते. तशांत हिंदु धर्मांत देखील खोटे साधु होते; लबाड वैरागी होते. ते लोकांना फसवून त्यांच्याकडून पैसे लुबाडीत असत. गरीब बिचाऱ्या लोकांना खरा धर्म कोणता व देवाची भक्ति कशी करावी ह्या गोष्टी समजत नसत.

तुकारामानें भागवत धर्माचीं तत्वें लोकांना पटवून दिलीं. ठिकठिकाणीं कीर्तनें करून त्यानें ढोंगी साधु, लबाड भट, खोटे कीर्तनकार यांचीं ढोंगबाजी व लबाडी चव्हाट्यावर आणली. लोकांमध्यें विठ्ठलाची भक्ति व धर्माची वागणूक आल्यामुळें त्यांचीं मनें खंबीर बनलीं. त्यांना मुसलमानांचें भय वाटेनासें झालें.

तुकाराम ढोंगी लोकांची भंवरी उडवूं लागल्यामुळें व कीर्तनें करूं लागल्यामुळें शास्त्री मंडळींना फार राग झाला. रामेश्वर भट्ट या नांवाचे एक विद्वान् शास्त्री होते. धर्माचा अभ्यास व उपदेश करण्याचा हक्क फक्त ब्राह्मणानांच आहे, अशी त्यांची समजूत होती. त्यांनीं तुकारामाला

कीर्तनें न करण्याविषयीं बजाविलें. तसेंच त्याच्या अभंगाच्या वह्या इंद्रायणी नदींत बुडवून टाकण्यांत आल्या. तुकारामाला फार वाईट वाटलें. तो विठ्ठला-समोर अन्नपाणी न घेतां बसून राहिला.

इकडे काय झालें कीं, रामेश्वर भट्टाच्या सर्व अंगाची आग होऊं लागली. विठ्ठलानें त्याला स्वप्नांत येऊन सांगितलें, " तुकारामाला तूं त्रास दिलास; त्याचा हा परिणाम. तूं त्याची क्षमा माग, म्हणजे तुझें दुःख नाहींसें होईल. "

ते तात्काळ तुकारामाला शरण गेले. त्यांचें अंग दुखणें बरें झालें. त्याच वेळीं असा चमत्कार झाल्याचें सांगतात कीं, तुकारामाच्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीच्या डोहांतून कोरड्या ठणठणींत बाहेर आल्या. हें पाहून तुकारामाच्या साधुत्वाविषयीं लोकांना शंका उरली नाहीं.

हल्के हल्के ही कीर्ति छत्रपती शिवाजी महाराजांच्या कानांवर गेली. महाराजांना साधूंच्याबद्दल फार आदर असे. त्यांनीं तुकारामांना आणण्यासाठीं पालखी घेऊन सेवक पाठविले; पैसे व दागिने पाठविले. तुकाराम महाराजांनीं ते दागिने तर घेतले नाहींतच; परंतु उलट उत्तर पाठविलें, "तुम्ही जरी राजे असलांत, तरी मला तुमच्या हुकमाप्रमाणें तुमच्याकडे येण्याचें कांहींच कारण नाहीं. माझ्या दृष्टीनें राजा काय आणि भिकारी काय, दोघेही सारखेच. शिवाय तुमच्याजवळ मला कांहीं मागावयाचेंहि नाहीं. पैसा आणि माती या दोन्हींचीहि किंमत माझ्या दृष्टीनें सारखीच."
तुकारामबुवांचा निर्लोभीपणा व सडेतोड वागणूक पाहून महाराजांचा त्यांच्याविषयींचा आदर वाढला. पुढें ते तुकारामबुवांच्या कीर्तनाला मधून मधून येऊं लागले.

ज्ञानेश्वरांनीं भागवत धर्माचा पाया घातला व तुकारामानें त्याच्यावर कळस चढविला असें लोक म्हणतात. पंडीत लोकांकडून ज्ञानेश्वरांनीं धर्माची मक्तेदारी काढून घेतली; सर्व जातींची योग्यता सारखी



ठरविली. लोकांच्या नेहमींच्या बोलभाषेंत ( मराठींत ) त्यांनीं धर्माचें सार सांगितलें व विठ्ठलाची भक्ति करण्याची सर्वांना मुभा दिली. अशा रीतीनें भागवत धर्माच्या इमारतीची सुरवात झाली; पाया घातला गेला. तुकाराम महाराजांनीं संस्कृतमधल्या धर्माचें सार अगदीं सोप्या व गोड शब्दांत लोकांना सांगितलें; ढोंगी साधूंची व शास्त्र्यांची फजिती केली व विठ्ठलभक्तीचा महिमा लोकांना पटवून दिला. आजदेखील देवळादेवळांतून टाळमृदुंगाच्या ठेक्यावर भाविक भजनकरी तुकारामाच्या अभंगांचा घोष करीत असतात. इंद्रायणींतून कोरड्या निघालेल्या तुकारामाच्या अभंगांतील भक्तीचा प्रवाह अनंत कालापर्यंत भाविक भक्तांना भक्तीचा ओलावा पुरवीत राहील.

' आम्ही जातों आमुच्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा '

असें म्हणून शेवटच्या कीर्तनाच्या दिवशीं तुकाराम महाराजांनीं लोकांचा निरोप घेतला.

### प्रश्न

१ पांखरें दाणे खात असतांना तुकाराम काय करीत होते ? कोणत्या हेतूनें त्यांनीं पांखरांना गोफण मारली नाहीं ?

२ तुकारामाच्या बायकोचा स्वभाव कसा होता ?

३. दुष्काळाच्या वेळीं तुकारामांना कोणते कष्ट पडले ?

४ त्या काळची परिस्थिती कशी होती ?

५ रामेश्वर भट्ट तुकारामांवर कां चिडले ? त्यांनीं काय विरोध केला ? या विरोधाचें पर्यवसान काय झालें ?

६ तुकारामांनीं शिवाजी महाराजांना काय उत्तर पाठविलें ?

७ तुकारामाच्या कर्तृत्वाचें सार थोडक्यांत सांगा.

८ तुकारामाचे कांहीं अभंग वाचा व पाठ करा.

---

# १० रामदास

लग्नमंडप माणसांनीं चिक्कार भरून गेला होता. वाजंत्रीं, वाद्यें वाजत होतीं. बोहल्यावर नवरदेव व नवरी हीं दोघे उभीं होतीं. त्यांच्यामध्यें अंतरपाट धरला होता. लोक वधुवरांवर अक्षता टाकीत होते व भटजी मंगलाष्टकें म्हणत होते, " शुभमंगल! सावधान! "

बारा वर्षांचा छोटा नवरदेव! त्याचें नांव नारायण. त्यानें हल्केच भटजीला विचारिलें, "सावधान म्हणजे काय?" भटजीनें सांगितलें, "बाबारे, सावध हो, लग्न लागल्यावर बायको, संसार इत्यादि गोष्टींचें ओझें तुझ्या माथ्यावर पडणार. तरी सावध होऊन संसार प्रपंचाचा गाडा अडचणींतून पार पाड."

भटजींच्या सांगण्यामुळें याला सावधान शब्दाचा अर्थ कळला. पहि-ल्यापासून त्याचा ओढा देवभक्तीकडे होता. संसारांत पडून आपण देवभक्तीला अंतरणार, हा विचार मनांत येतांच तो सावध झाला व त्यानें मंडपांतून धूम ठोकली. लग्न तसेंच राहिलें.



नारायण हा सूर्याजीपंत ठोसर नांवाच्या कुलकर्ण्यांचा मुलगा. ते गोदावरीच्या कांठच्या जांब या गांवीं राहात असत. याच गांवीं इ. स. १६०८ मध्यें नारायणाचा जन्म झाला.

लग्नांतून पळालेला नारायण नाशिक, पंचवटी या क्षेत्रांच्या ठिकाणीं आला. गोदावरीच्या पाण्यांत उभे राहून त्यानें तपश्चर्या केली. तो इतका वेळ पाण्यांत उभा राहात असे कीं, पाण्यांतील मासे त्याच्या पायाच्या मांसाचे लचके तोडीत असत. तरी सुद्धां हूं कीं चूं न करतां तो श्रीरामाचें ध्यान करीत असे. अशा प्रकारें बारा वर्षे रामाची भक्ति केल्यावर

श्रीराम त्याला प्रसन्न झाले. लोक त्याला 'रामदास' ( रामाची भक्ति करणारा ) असें म्हणूं लागले.

त्यानंतर बारा वर्षे रामदासांनीं हिंदुस्थानांतील निरनिराळीं क्षेत्रें पहाण्यांत घालविलीं. त्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत मोगलांचें राज्य होतें. महाराष्ट्रांत अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा, बेदर, व वऱ्हाड या भागांत मुसलमानांचीं राज्यें होतीं. त्यांच्याकडून हिंदूंचीं देवळें फोडलीं जात असत; हिंदूंना बाटविलें जाई. मुसलमान अधिकाऱ्यांच्या जुलमाला लोक त्रासून गेले होते. रामदासांनीं फिरतामध्ये लोकांची ही केविलवाणी स्थिति पाहिली होती. तीर्थयात्रा संपवून परत आल्यावर रामदास सातारा जिल्ह्यांतील चाफळच्या खोऱ्यांत राहूं लागले.

येथून पुढें रामदासांच्या कामाची दिशा ठरून गेली. देशाच्या सेवेला त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें. लोकांनीं धैर्यवान बनलें पाहिजे; मुसलमानी राजकर्त्यांच्या जुलुमाला तोंड दिलें पाहिजे. एवढ्यासाठीं परमेश्वराचें सहाय्य लोकांनीं मिळविलें पाहिजे, असें त्यांना वाटत होतें. लोकांमध्ये जागृति उत्पन्न करण्याचें काम एकट्यादुकट्याचें नव्हतें. म्हणून या कामासाठीं त्यांनीं बरेच शिष्य तयार केले व मग सर्वांनीं मिळून सर्व देशभर कार्य करण्यास सुरवात केली.

लोकांना बलवान करण्यासाठीं त्यांनीं गांवोगांवीं आखाडे ( तालिमी ) सुरू केले. मारुती हा शक्तीचा देव असल्यानें गांवोगांव मारुतीचीं व रामाचीं देवळें बांधविलीं. ठिकठिकाणीं मठ स्थापन करून रामदासांचे शिष्य तेथें राहूं लागले; लोकांना धर्माचें व बलाचें शिक्षण देऊं लागले. याचा परिणाम असा झाला कीं, थोड्याच दिवसांत बलवान व धर्मनिष्ठ तरूण देशांत तयार होऊं लागले. लोकांत संघटना ( एकी ) होऊं लागली. बलवान लोकांची ही संघटना मुसलमान अधिकाऱ्यांच्या जुलमाच्या विरुद्ध चळवळ

करूं लागली. रामदासांची शिकवण मूळ तशी होती. निव्वळ राम राम म्हणत जुलूम सहन करण्यापेक्षा दुष्ट मनुष्याच्या ठोशाला परत ठोसा दिला पाहिजे, हीच ती शिकवण.

शिवाजी महाराजांच्या कानांवर रामदास स्वामींची कीर्ति गेल्यावर त्यांनीं त्यांची गांठ घेतली. ते त्यांना गुरु मानूं लागले. रामदास स्वामींचा उपदेश शिवाजी महाराजांच्या फार उपयोगी पडत असे. महाराजांना राज्य स्थापन करतांना रामदासांनीं तयार केलेली बलशाली लोकांची संघटना बरीच उपयोगी पडली.

गुरुदक्षिणा म्हणून महाराजांनीं स्वामींना राज्य अर्पण केलें. तें त्यांनीं घेतलें नाहीं, परंतु स्वामीसारख्या संन्याश्याची खूण म्हणून मराठी राज्याच्या झेंड्याचा रंग भगवा ( संन्याश्याच्या कपड्याच्या रंगाप्रमाणें ) ठेवण्यांत आला.

### प्रश्न

१ लग्नाच्या वेळीं ' सावधान ' असा मंत्र कां म्हणतात ?

२ या मंत्रापासून नारायणानें कोणता धडा घेतला ?

३ रामदासांच्या कामाची दिशा कोणती ?

४ रामदासांच्या कामगिरीचा लोकांवर काय परिणाम झाला ?

५ शिवाजी महाराजांनी त्यांना कोणतें दान दिलें ? रामदासांनीं त्याची परतफेड कशी केली ?


६ रामदासांनीं लिहिलेले ' मनाचे श्लोक ' वाचा व पाठ करा.

---

[library stamp] २५९९ ... ०१ - ८१

# ११ स्वामी दयानंद सरस्वती

तो महाशिवरात्रीचा दिवस होता. ह्या दिवशीं लोक उपवास करितात व शंकराची पूजा करतात; रात्रीं खूप वेळपर्यंत शंकराच्या मंदिरांत जागरण करतात. नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें काठेवाडांतील एका खेड्यांतील लोक शंकराच्या देवळांत जागरण करीत होते. जसजशी रात्र अधिक होऊं लागली तसतसे लोक झोपीं जाऊं लागले. लोकांची गडवड शांत झाली. तरी एका लहानग्या मुलाला मात्र झोंप येईना. त्या मुलाचें नांव मूळ शंकर. तो भक्तिभावानें महादेवाच्या पिंडीकडे पहात होता. इतक्यांत एक



पिटुकुलें उंदराचें पिलूं पिंडीजवळ आलें व पिंडीपुढच्या नैवेद्य खाऊं लागलें. खाणें झाल्यावर पिंडीवर उड्या मारीत तें निघून गेलें. तें पाहून मूळ शंकरला फार वाईट वाटलें. उंदीरदेखील डोक्यावर चढून देवाचा अपमान

करतात. मग अशा दगडाच्या देवांची पूजा करण्यांत काय अर्थ? दगडाच्या व धातूंच्या मूर्तींत देव नसतो अशी त्याची खात्री झाली.

मूळशंकरचा जन्म इ. स. १८२४ मध्यें काठेवाडांतील एका खेड्यांत झाला. त्याचे वडील शंकराचे भक्त होते. त्यांच्यामुळें मूळशंकरहि शंकराची भक्ति करूं लागला. परंतु महादेवाच्या देवळांतील तो देखावा पाहून त्याचा मूर्तीवरचा विश्वास उडाला.

विद्याभ्यास चालू असतांच त्यानें हिंदुधर्मांतील ग्रंथांचा अभ्यास केला. देवासंबंधींचे विचार एकसारखे त्याच्या मनांत घोळूं लागले. आई-बापांनीं त्याचें लग्न करण्याचें ठरविलें. परंतु ही गोष्ट त्याला पसंत पडेना. लग्न झाल्यानंतर आपण इतर लोकांप्रमाणेंच संसारी बनूं व मग देवासंबंधींचें ज्ञान आपणांस मिळवितां येणार नाहीं, असें त्याला वाटलें. हा विचार मनांत येतांच तो घरांतून गुपचूपपणें पळून गेला. त्यानें वरींच वर्षें हिंदुस्थानांत प्रवास करून व थोर थोर साधूंच्या गाठी घेऊन हिंदुधर्माचें व देवासंबंधींचें ज्ञान मिळविलें. हा विद्वान मूळशंकर आतां संन्याशासारखा पोषाख घालूं लागला. लोक त्याची विद्वत्ता पाहून त्याला स्वामी दयानंद सरस्वती असें म्हणूं लागले.

स्वामी दयानंदांच्या वेळीं हिंदुधर्माची स्थिति खालावूं लागली होती. उच्च वर्गांतील हिंदु लोक महार-मांग इत्यादि लोकांचा विटाळ मानीत होते. ते त्यांना पाणवठ्यावर पाणी भरूं देत नसत, कीं मंदीरांच्या आसपास देखील येऊं देत नसत. हिंदुधर्माचे मुख्य ग्रंथ वेद हे होत. परंतु वेदांचा अभ्यास सोडून देऊन उच्च वर्गाचे हिंदु मूर्तींचीच पूजा करूं लागले. ही गोष्ट ख्रिस्ती व मुसलमान लोकांच्या ध्यानांत आली.

ते खालच्या वर्गांतील (महार, मांग, भिल्ल इत्यादि) हिंदु लोकांना नोकऱ्या, पैसे व शिक्षण देऊं लागले. उच्च वर्गांतील हिंदूंच्या छळाला

कंटाळलेले हे मागासलेले लोक ख्रिस्ती व मुसलमान बनूं लागले. अशा रीतीनें हिंदूंची संख्या कमी कमी होऊं लागली.

स्वामी दयानंद सरस्वतींना हें दृश्य पाहावलें नाहीं. जगांत हिंदुधर्म श्रेष्ठ म्हणून जगला पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. एवढ्यासाठीं ते उद्योगाला लागले. सर्व हिंदूंची एकी करण्यासाठीं त्यांनीं आर्यसमाज स्थापन केला. आर्यसमाजाचीं तत्त्वें आर्यांच्या वेळच्या हिंदुधर्माप्रमाणें होतीं. आर्यसमाजांत जातिभेद मानला जात नाहीं. सर्व हिंदू समान दर्जाचे समजले जातात. ईश्वर एकच आहे; निरनिराळ्या मूर्तींची पूजा करावयाची नाहीं; आणि आर्यांचे मूळचे धर्मग्रंथ जे वेद त्यांना पूज्य मानावयाचें. आर्यसमाजानें सर्वांना सारखी योग्यता दिल्यामुळें बऱ्याच जातींतील लोक आर्यसमाजांत येऊं लागले. बाटून ख्रिस्ती व मुसलमान झालेल्या हिंदु लोकांना आर्यसमाजानें शुद्ध करून हिंदु बनविण्यास सुरवात केली.

खालच्या वर्गांतील हिंदु अज्ञानी असत. त्यांना चांगला उद्योगधंदा व नोकऱ्याचाकऱ्या मिळत नसत. म्हणून त्यांची स्थिति फार हलाखीची असे. आपली स्थिति सुधारण्यासाठीं ते लोक ख्रिस्ती अथवा मुसलमान बनत. ही गोष्ट ध्यानांत घेऊन स्वामी दयानंदांनीं ह्या लोकांसाठीं ठिकठिकाणीं मुलांमुलींच्या शाळा काढिल्या. अनाथ मुलांमुलींसाठीं त्यांनीं वसतिगृहें काढिलीं व गरीब लोकांसाठीं औषधपाण्याची सोय केली.

सपाटीवर येण्यापूर्वी नदीच्या प्रवाहाला खडकांवरून व कड्यांवरून उड्या घ्याव्या लागतात. दयानंद स्वामींच्या वाटेंत देखील असले अडथळे आले. ख्रिस्ती व मुसलमान समाजांत बाटून जाणाऱ्या हिंदूंचें प्रमाण कमी होऊं लागलें. त्यामुळें ते लोक स्वामींचा द्वेष करूं लागले. कर्मठ ब्राह्मणांनाहि त्यांचा राग आला. कारण आर्यसमाजांत ब्राह्मण व महार हे दोघेहि एकाच योग्यतेचे ठरत असत. ही गोष्ट कर्मठ भटजींना आवडली नाहीं. ते लोक स्वामींना त्रास देऊं लागले.

एकदां स्वामी पुण्याला आले होते. स्वामींचें कार्य व योग्यता पाहून लोकांनीं त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढली. परंतु कर्मठ भटजींना ही गोष्ट आवडली नाहीं. त्यांनीं एका गाढवाच्या पाठीवर 'स्वामी दयानंद सरस्वती' असें लिहून त्याची मिरवणूक काढिली. सूर्यावर थुंकणाऱ्या माणसांची थुंकी स्वतःच्याच अंगावर येते, ही गोष्ट त्यांना समजावयास पाहिजे होती.

## प्रश्न

१ उंदराला पिंडीवर खेळतांना पाहून मूळशंकरनें कोणता निष्कर्ष काढला ?

२ त्या काळची हिंदू लोकांची परिस्थिती कशी होती ? ही परिस्थिती दूर करण्यासाठीं स्वामी दयानंद यांनीं काय केलें ?

३ आर्य समाजाचीं तत्वें सांगा.

४ लोकांनीं स्वामींचा छळ कसा केला ?

# १२. स्वामी विवेकानंद

अंगांत भगवी कफनी, डोक्यावर केशरी रंगाचा फेटा व कमरेखालीं विजार अशा पोषाखांत तो हिंदी साधु शिकागो शहरांतील सुंदर रस्त्यानें




जात होता. तो रूपानें सुंदर, शरीरानें बांधेदार व मोहक होता. त्याच्या चमत्कारिक पोषाखाची शिकागोंतील गोऱ्या लोकांना मोठी गंमत वाटली. लहान लहान मुलांच्या तर त्याच्या पाठीमागें झुंडीच्या झुंडी लागल्या. कारण तशा प्रकारचा पोषाख तिकडे कुणीच करीत नसे. त्या साधूचें नांव स्वामी विवेकानंद.

शिकागो हें शहर अमेरिका खंडांत आहे. इ. स. १८९३ सालीं शिकागो शहरांत जगांतील सर्व धर्मांच्या पुढाऱ्यांची सभा भरणार होती. त्या सभेसाठीं निरनिराळ्या देशांतील व धर्मांतील थोर थोर लोकांना आमंत्रणें गेलीं होतीं. ठरलेल्या दिवशीं सभागृह माणसांनीं चिक्कार भरून गेलें होतें. स्वामीजींना सभेसाठीं आमंत्रण नव्हतें. परंतु प्रयत्न करून त्यांनीं सभेंत बोलण्याची परवानगी मिळविली.

सभागृहाच्या उंचभागीं थोर लोक बसले होते. स्वामी विवेकानंदहि त्यांच्यांत होते. त्यांचा विचित्र पण अंगाला शोभून दिसणारा पोषाख,

सुंदर चेहरा व भव्य शरीर यांच्यावर सर्व लोकांचें लक्ष खिळलें होतें. स्वत:ची पाळी येतांच ते बोलावयास उभे राहिले. गंमत वाटून लोक थोडें हसूं लागले. स्वामीजी बोलूं लागले. किती गोड त्यांचा आवाज ! जणुं कोणी गाणें गात गात बोलत आहे ! गारूडी पुंगी वाजवतो. नाग डोलूं लागतो. स्वामीजी बोलूं लागले. लोक डोलूं लागले. हिंदु धर्म फार श्रेष्ठ आहे याची त्यांनीं जमलेल्या विद्वान् लोकांना कल्पना दिली. स्वामींची विद्वत्ता पाहून लोक आश्चर्यचकित होऊन गेले. कांहीं गोऱ्या लोकांनीं हिंदुधर्म स्वीकारला.



स्वामी विवेकानंदांचा जन्म इ. स. १८६३ मधें बंगाल प्रांतांत झाला. त्यांचें मूळचें नांव नरेंद्र असें होतें. नरेंद्राचा अभ्यास चालू असतांच त्याला देवभक्तीचें वेड लागलें. असें सांगतात कीं, तो एकदां देवाचें ध्यान करीत बसला असतांना त्याच्याजवळ एक नाग आला. तो ध्यान करण्यांत इतका दंग होता कीं, नागाकडे त्याचें लक्षदेखील गेलें नाहीं.

परोपकाराची संवयहि त्यांना लहानपणींच लागली होती. एका भिकाऱ्याला तर त्यांनीं एकदां नवें धोतर देऊन टाकलें होतें.

. नरेंद्राचा इंग्रजी अभ्यास चालू असतां तो एका. साधूंच्या दर्शनास गेला. त्यांचें नांव रामकृष्ण परमहंस. सर्व बंगालभर त्यांची कीर्ति पसरली होती. बरेच लोक त्यांचे शिष्य बनले होते. नरेंद्रदेखील त्यांचा शिष्य बनला.

नरेंद्राला ईश्वराच्या दर्शनाची ओढ लागली होती. त्यानें रामकृष्ण परमहंसांना विचारलें, "गुरुजी, देव आहे का? तो तुम्हांला दिसला का?" गुरुजींनीं उत्तर दिलें, "होय, देव आहे व तो मला नेहमीं दिसतो. तुला तो दिसत नाहीं. इतर माणसांनाहि तो दिसत नाहीं. पाण्यावर शेवाळ्याचा तरंग आल्यावर शेवाळाखालचें पाणी आपणास दिसत नाहीं. तसेंच संपत्तीचा लोभ, स्वतःबद्दल गर्व, कीर्ति मिळविण्याची हाव इत्यादि गोष्टींमध्यें गुरफटलेल्या मनुष्यास परमेश्वर दिसत नाहीं. निरनिराळ्या वासनांचें हें शेवाळ जर मनुष्यानें दूर केलें, तर त्याला देव दिसेल." परमहंसांचें भाषण त्याला पटलें. त्यामुळें देव आहे अशी त्याची पक्की खात्री झाली. तो मनोभावानें देवाची भक्ति करूं लागला.

गुरूंवर नरेंद्राचें किती प्रेम होतें, हें पुढील गोष्टीवरून कळून येईल. रामकृष्ण परमहंसांच्या गळ्याला एक वाईट रोग झाला होता. गळ्याला जखम होऊन तींतून पू वाहात होता. डॉक्टरानें त्या जखमेंतील पू एका पेल्यांत काढून जखमेला औषध लाविलें व सर्व शिष्यांना परमहंसांपासून दूर राहण्यास सांगितलें. त्याचें कारण असें कीं, त्यांच्या सहवासानें तो रोग इतरांना झाला असता. या भीतिमुळें इतर शिष्य स्वामींजवळ जाईनात. परंतु नरेंद्रानें तो घाण रक्तानें भरलेला पेला घटाघट पिऊन टाकला. याला म्हणावें गुरुभक्ति! यालाच म्हणावें खरा शिष्य! रामकृष्ण परमहंसांनींहि शिष्याची योग्यता ओळखून त्याला ईश्वराविषयीं सर्व ज्ञान दिलें.

याच सुमारास नरेंद्र बी. ए. झाला. नोकरीधंदा करून सुखांत राहावें असा विचार त्यानें मनांत देखील आणला नाहीं. आईची परवानगी घेऊन तो संन्यासी बनला. जन्मभर तो ब्रह्मचारी राहिला. त्यानें लग्न केलें नाहीं.

त्या वेळीं हिंदु समाजाची स्थिति फारच वाईट झाली होती. स्वामी दयानंदाच्या गोष्टींत ती दिलीच आहे. नरेंद्रानें ही स्थिति नाहींशी करण्यासाठीं हिंदुस्थानभर प्रवास करून व्याख्यानें दिलीं. हिंदुधर्म श्रेष्ठ आहे. जगांत देव आहे; त्याची भक्ति करा. सर्व लोक सारख्या योग्यतेचे आहेत. माणसांनीं एकमेकांना श्रेष्ठ अगर कनिष्ठ मानूं नये. अशा प्रकारचा उपदेश करीत नरेंद्र देशभर फिरला. त्याची थोरवी पाहून लोक त्याला स्वामी विवेकानंद असें म्हणूं लागले.

केवळ स्वतःच्या देशबांधवांनाच हिंदु धर्माची थोरवी पटवून देऊन त्यांचें मन शांत होईना. इतर देशांतील लोकांनाहि ती पटवावी असें त्यांच्या मनानें घेतलें. देवानें त्यांना ती संधि दिली. निश्चयी माणसांना परमेश्वर नेहमींच मदत करितो. स्वामी विवेकानंद हे सर्व धर्मांच्या सभेसाठीं अमेरिकेंत गेले. स्वामीनीं काय कामगिरी केली, ती गोष्टीच्या सुरुवातीसच सांगितली आहे.

अमेरिकेप्रमाणेंच स्वामी इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत गेले. तेथील गोऱ्या लोकांना त्यांनीं हिंदु धर्माची श्रेष्ठता पटविली. स्वामींचीं व्याख्यानें एकण्याला तिकिटें काढून गोऱ्या स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी येत असत.

पुढें स्वदेशांत आल्यावर त्यांनीं एक आश्रम काढिला. त्या आश्रमाला त्यांनीं 'रामकृष्णाश्रम' असें आपल्या गुरूंचें नांव दिलें. आश्रमांतील लोकांनीं हिंदु-धर्माचा प्रसार, दुष्काळांत लोकांना धान्याची मदत, रोगांच्या सांथीच्या वेळीं गरिबांना औषधपाण्याची मदत इत्यादि परोपकाराच्या गोष्टी केल्या. आज देखील आश्रमांतील लोक गरीब जनतेसाठीं ह्या गोष्टी करीत असतात.

वरील सर्व गोष्टी करीत असतां स्वामींनीं प्रवासाच्या दगदगीकडे पाहिलें नाहीं कीं तहानभुकेची पर्वा केली नाहीं. त्यामुळें त्यांची प्रकृति ढासळली. नंतर त्यांनीं इ. स. १९०२ मधें समाधि घेतली.

स्वामी विवेकानंद जगांतून गेले. त्यांचें शरीर नाहींसें झालें; परंतु नांव मात्र अमर राहिलें. लोक आपल्या वाडवडिलांच्या तसबिरी घरांत लावितात. परंतु धर्मासाठीं आयुष्य वेंचणाऱ्या या ब्रह्मचारी संन्याश्याच्या तसबिरीवर हजारों लोकांच्या घरांतून फुलें वाहिलीं जातात.

## प्रश्न

१ स्वामी विवेकानंद दिसावयास कसे होते ? ते कोणता पोशाख करीत ?

२ त्यांच्या वक्तृत्वाबद्दल तुम्हांला काय माहिती आहे ?

३ रामकृष्ण परमहंसांनीं त्यांना काय उपदेश दिला ?

४ विवेकानंदांची गुरुभक्ती कोणत्या गोष्टीनें सिद्ध होते ? गुरुभक्तीची दुसरी एखादी गोष्ट तुम्हांला माहीत असल्यास सांगा.

५ विवेकानंदांनीं अमेरिकेंत जाऊन काय केलें ?

६ रामकृष्णाश्रमानें कोणतें कार्य करून दाखविलें ?

# १३. महात्मा गांधी

इ. स. १९३१ सालांतील गोष्ट. हिंदुस्थानचे बादशहा पांचवे जॉर्ज हे आपल्या राजवाड्यांत एका साधूची वाट पहात होते. राजवाड्याकडे जाणाऱ्या त्या साधूला पहाण्यासाठीं रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या दारा-खिडक्यांतून इंग्रज स्त्री-पुरुषांची दाटी झाली. इंग्लंडसारख्या सुधारलेल्या व अतिशय थंड हवेच्या देशांत देखील त्या साधूनें आपला खेडवळ व साधासुधा पोशाख बदलला नाहीं. इतर साधूंप्रमाणें त्याच्या डोक्यावर केसाच्या जटा नव्हत्या कीं, त्यानें दाढी वाढविलेली नव्हती. अंगावर भगव्या रंगाचे कपडे नव्हते कीं, अंगाला राख फासलेली नव्हती. हातांत काठी, कमरेस खादीचा जाडाभरडा पंचा व अंगावर कांबळी अशा थाटानें तो बादशहाच्या भेटीस जात होता. तो येतांच बादशहा जॉर्ज यांनीं उभे राहून त्याचें स्वागत केलें. मंत्रतंत्र, जादूटोणा अथवा चमत्कार दाखवून बादशहाला खूष करून पैसे मिळविण्यासाठीं म्हणून कांहीं तो तेथें गेला नव्हता; तर हिंदी लोकांची इंग्रजांच्या गुलामगिरींतून सुटका करावी या हेतूनें. हा थोर साधू म्हणजे महात्मा गांधी हे होत.

मोहनदास हें त्यांचें नांव. त्यांचा जन्म इ. स. १८६९ मध्यें काठे-वाडांत झाला. त्यांचे वडील करमचंद गांधी हे एका संस्थानांत दिवाण होते. मोहनदासाच्या ल्हानपणींच वडील मरण पावले. वडिलांनीं मागें ठेविलेल्या थोड्याफार संपत्तीमुळें मोहनदासांना विलायतेंत जाऊन बॅरिस्टर होतां आलें.

ल्हानपणीं मोहनदासाच्या हातून वाईट संगतीमुळें कांहीं चुका झाल्या एका वाईट वागणुकीच्या मित्रानें त्यांना विड्या ओढण्यास व मांस खाण्यास



शिकविलें. मांस खाण्यानें मनुष्य बलवान होतो असा गैरसमज त्या मित्रानें हाडकुळ्या मोहनदासांचा करून दिला. त्यामुळे इच्छा नसतांहि ते आईबापांना चोरून मांस खाऊं लागले. हा खर्च भागविण्यासाठीं एकदां तर त्यांनीं घरांतून सोन्याचें कडें चोरून नेलें. परंतु आपल्या वाईट वर्तणुकीचा पश्चात्ताप वाटून त्यांनीं आपली चूक कबूल केली. अशा रीतीनें स्वतःच्या चुका सुधारून सन्मार्गानें वागण्याची संवय त्यांना लहानपणापासूनच जडली होती.

बॅरिस्टर होऊन आल्यावर मोहनदास गांधी प्रथम मुंबई व काठेवाड येथें वकीली करूं लागले. बरेच दिवस इंग्लंडांत घालविल्यामुळें तेथील लोकांच्या राहाणीची छाप त्यांच्यावर पडली होती. त्यांच्या घरांतील व्यवस्था व पोषाख ह्या गोष्टी अगदीं इंग्रजी पद्धतीच्या असत.

याच सुमारास एका खटल्याच्या निमित्तानें त्यांना दक्षिण आफ्रिकेंत जावें लागलें. तेथील हिंदी लोकांची स्थिति पाहून गांधींच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. तेथून पुढें स्वतःचें सर्व आयुष्य त्यांनीं लोकसेवेसाठीं खर्च करण्याचें ठरविलें. दक्षिण आफ्रिका म्हणजे मोहनदास गांधींच्या कीर्तिमंदिराचा पाया होय.

दक्षिण आफ्रिकेंत पूर्वीं रानटी लोक राहात होते. गोऱ्या लोकांनीं त्यांना तेथून हांकून लाविलें व मग ते तेथें शेती-भाती करूं लागले; खाणींतून सोनें-रूपें बाहेर काढूं लागले. या कामासाठीं त्यांनीं हिंदुस्थानांतून मजूर नेले. हिंदी मजूर काटकसरी स्वभावाचे असल्यामुळें मजूरीचे पैसे शिल्लक टाकून त्यांतून ते लोक तेथें घरेंदारें बांधूं लागले; व्यापार करूं लागले. ही गोष्ट गोऱ्या लोकांना आवडेना. गोऱ्या लोकांच्या आगगाड्यांतून, हॉटेलांतून व रस्त्यानें जाण्यास हिंदी लोकांना मनाई असे. इतकेंच नव्हे तर ख्रिस्ती पद्धतीनें न झाल्यामुळें हिंदी लोकांचीं लग्नें देखील बेकायदेशीर ठरविलीं जात असत. एकंदरीनें या ' काळ्या ' लोकांना गोरे लोक गुलामांप्रमाणें वागवीत असत.

गांधींनीं पुढाकार घेऊन हिंदी लोकांची जूट बनविली. लोकांवर होणारा जुलूम नाहींसा करण्यासाठीं त्यांनीं एक नवीन युक्ति काढिली. तिचें नांव ' सत्याग्रह ' ! जुलमी कायदे पाळावयाचे नाहींत; ते कायदे लोकांनीं पाळावेत म्हणून सरकारनें कितीहि जुलूम केला तरी तो निर्भयपणें सहन करावयाचा. पण माघार म्हणून घ्यावयाची नाहीं; याचेंच नांव सत्याग्रह. हत्यारबंद अशा बलाढ्य सरकारशीं गरीब बिचारे विनहत्यारी मजूर कसे बरें लढणार ? तेव्हां सत्याग्रह हीच खाशी युक्ति ठरली.

गांधींनीं हिंदी लोकांत जूट घडवून आणतांच गोऱ्या लोकांचें पित्त भडकलें. रस्त्यानें जात असतांना लहान लहान गोरीं मुलें त्यांची चेष्टा

करूं लागलीं. कित्येक आडदांड गोऱ्यांनीं तर प्रसंगीं त्यांना चोप देखील दिला.

गांधींच्या देखरेखीखालीं मजुरांनीं सत्याग्रह पुकारला. सरकारनें या लोकांवर गोळीबार केला; गांधींना तुरुंगांत टाकिलें; परंतु लोक हार गेले नाहींत. शेवटीं सरकार हरलें. जुलमी कायदे दूर झाले. गांधींची तुरुंगांतून सुटका झाली. तरवारी-बंदुकांशिवाय लढणाऱ्या मजुरांचा जय झाला. गांधींच्या थोर कामगिरीमुळें लोक त्यांना 'महात्मा गांधी' असें म्हणूं लागले.

दक्षिण आफ्रिकेंतील कार्य आटोपल्यावर महात्मा गांधी हिंदुस्थानांत आले. तेव्हांपासून तो थेट आजतागायतपर्यंत हिंदी लोकांच्या उद्धारासाठीं हा थोर पुरुष एकसारखा झटत आहे. देशाच्या हितासाठीं सर्वस्वावर लाथ मारून महात्माजी फकीर बनले आहेत.

हिंदुस्थानांत आल्यावर खेडा जिल्ह्यांतील शेतकरी, चंपारण्यांतील शेतकरी व अहमदाबाद येथील गिरणी मजूर यांचे सत्याग्रह घडवून आणून गांधीजींनीं त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करविला.

उगमाजवळ नदीचा प्रवाह लहान असतो. परंतु पुढें तो अफाट होत जातो. तसेंच गांधीजींचें कार्य आहे. दक्षिण आफ्रिकेंतील लहानशा सत्याग्रहापासून सुरवात झालेल्या त्यांच्या जनसेवेंत आज कितीतरी गोष्टी मोडत आहेत.

इ. स. १९२० पासून ते काँग्रेसचे मुख्य पुढारी झाले. काँग्रेस म्हणजे हिंदी लोकांच्या स्वातंत्र्यासाठीं इंग्रज सरकारशीं झगडणारी संस्था. तिच्यांत सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक आहेत. काँग्रेसतर्फे महात्मा गांधींनीं दोन तीन वेळां सत्याग्रह पुकारिला. लाखों लोक सत्याग्रहांत सामील झाले. सत्याग्रही लोकांवर सरकारनें कित्येक वेळां लाठीहल्ला व

गोळीबार केले; हजारों लोकांना, पुढाऱ्यांना व गांधीजींना तुरुंगांत टाकलें व परत सोडून दिले. गांधीजींच्या देखरेखीखालीं हिंदी स्वातंत्र्याचा झगडा अद्याप चालूंच आहे.

गांधीजींचें आयुष्य म्हणजे जणुं काय बहुरंगी सुंदर इंद्रधनुष्यच आहे विविध प्रकारच्या रंगांनीं इंद्रधनुष्याला सौंदर्य आलें आहे, तर नानाप्रकारच्या चळवळींनीं महात्माजींच्या आयुष्याचा रंगीन गोफ विणला जात आहे. खेड्यांतील लोकांची स्थिति सुधारण्यासाठींच त्यांनीं चरखा व खादी यांचा चोंहींकडे प्रसार केला. त्यामुळें चैनीच्या कापडांत होणारा पैशांचा खर्च थांबला व गरीबांना कामधंदाहि मिळाला. स्वतः महात्माजी सूत कांततात व खादीचा पंचा वापरतात. महार, मांग, चांभार, भंगी इत्यादि लोकांना हिंदु लोकांनीं कमी मानूं नये म्हणून त्यांनीं त्यांना ' हरिजन ' ( देवमाणसें ) असें गोड नांव दिलें आहे. ते त्यांच्या वस्तींत जाऊन राहातात. दारू पिण्यामुळें मजूर व शेतकरी कंगाल होतात. यासाठीं त्यांनीं दारूबंदीचा कायदा घडवून आणिला. हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें एकी घडवून आणण्यासाठीं ते रात्रंदिवस झटत आहेत.

महात्माजींचा देवावर पूर्ण विश्वास आहे. दिवसांतून शेंकडों थोर थोर माणसें कामानिमित्तानें त्यांच्याकडे येतात जातात; शेंकडों पत्रांची आवक-जावक सुरूं असते; तथापि देवाची प्रार्थना महात्माजी कधींच चुकूं देत नाहींत. शब्दानें देखील ते कुणाला दुखवीत नाहींत, मग प्रत्यक्ष मारणें तर दूरच राहिलें. एवढे थोर ' बापूजी ', परंतु लहान मुलें दिसलीं कीं, ते त्यांचे खेळगडी बनतात.

राहायला झोंपडी, खायला थोडीं फळें, खजूर व शेळीचें दूध आणि ल्यायला खादीचा पंचा, एवढ्या गोष्टी असल्या कीं, महात्माजींचें काम

भागलें. कंगालाहून कंगाल अशा ह्या दरिद्रीनारायणानें शब्द काढावयाचा अवकाश की कोट्यावधि रुपयांचे ढीग त्यांच्यासमोर येऊन पडतात. महारवाड्यांतलि अथवा भंगीवाड्यांतील त्यांच्या झोपडीसमोर राजेरजवाड्यांच्या मोटारी खेटा घालतात. गोरा युरोपियन असो की काळा शिद्दी, गरीब असो की श्रीमंत असो, गाय असो की साप असो, सर्वच महात्माजींचें मित्र! सर्वांवर त्यांचें सारखेंच प्रेम! महात्माजी म्हणजे कलियुगांतील धर्मराज भासतात. इतर साधुसंतांना स्वप्नांत देव दिसतो, असें म्हणतात. परंतु महात्मा गांधींना स्वप्नांतदेखील गोरगरीबांच्या झोंपड्या दिसतात. त्यांचे फाटकेतुटके संसार पाहून व दुःखाच्या किंकाळ्या ऐकून त्यांचें अंतःकरण भरून येतें. इतर साधु देवळांतील देवांची पूजा करतात. महात्मा गांधींचा देव म्हणजे लक्षावधि गोरगरिब लोक. एकीकडे सुधारलेली युरोपियन राष्ट्रें अॅटम बॉम्बसारखे राक्षस निर्माण करून जगाचा चक्काचूर करीत आहेत; तर दुसरीकडे मानव जातीच्या उद्धारासाठीं हा देवदूत शांतीची वीणा वाजवीत आहे.

## प्रश्न

१ पांचवे जॉर्ज यांना भेटण्यासाठीं महात्मा गांधी कोणत्या पोशाखांत गेले?
२ मोहनदासाच्या हातून लहानपणीं कोणकोणत्या चुका घडल्या?
३ दक्षिण आफ्रिकेंत महात्मा गांधींनीं कोणतें सत्कार्य केलें?
४ महात्मा गांधींचें ब्रीद कोणतें?
५ महात्मा गांधींचें हत्यार कोणतें?
६ महात्मा गांधी कोणता आहार घेतात?
७ कॉंग्रेस या संस्थेसंबंधीं तुम्हांला काय माहिती आहे?
८ हरिजनांसाठीं गांधींनीं काय केलें?
९ गांधींना 'दरिद्रीनारायण' कां म्हणतात?

त्र्यंबक रामचंद्र गोडगे, बी. ए., बी. टी.

यांचीं पुस्तकें

१. रामायणांतील गोष्टी .... किं. ५ आणे
२. महाभारतांतील गोष्टी .... किं. ५ आणे
३. भागवतांतील गोष्टी .... किं. ५ आणे
४. संतांच्या गोष्टी .... किं. ८ आणे
५. ट्रेनिंगचा प्रश्नोत्तर इतिहास— .... किं. १२ आणे

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण :—
मेसर्स जोशी आणि लोखंडे,
३३५ शनिवार पेठ, पुणे २.

IRBK-0102519
IRBK-0102519

करूं लागली. रामदासांची शिकवण मूळ तशी होती. निव्वळ राम राम म्हणत जुलूम सहन करण्यापेक्षा दुष्ट मनुष्याच्या ठोशाला परत ठोसा दिला पाहिजे, हीच ती शिकवण.

शिवाजी महाराजांच्या कानांवर रामदास स्वामींची कीर्ति गेल्यावर त्यांनीं त्यांची गांठ घेतली. ते त्यांना गुरू मानूं लागले. रामदास स्वामींचा उपदेश शिवाजी महाराजांच्या फार उपयोगी पडत असे. महाराजांना राज्य स्थापन करतांना रामदासांनीं तयार केलेली बलशाली लोकांची संघटना बरीच उपयोगी पडली.

गुरुदक्षिणा म्हणून महाराजांनीं स्वामींना राज्य अर्पण केलें. तें त्यांनीं घेतलें नाहीं. परंतु स्वामीसारख्या संन्याश्याची खूण म्हणून मराठी राज्याच्या झेंड्याचा रंग भगवा ( संन्याश्याच्या कपड्याच्या रंगाप्रमाणें ) ठेवण्यांत आला.

## प्रश्न

१ लग्नाच्या वेळीं ' सावधान ' असा मंत्र कां म्हणतात ?

२ या मंत्रापासून नारायणानें कोणता धडा घेतला ?

३ रामदासांच्या कामाची दिशा कोणती ?

४ रामदासांच्या कामगिरीचा लोकांवर काय परिणाम झाला ?

५ शिवाजी महाराजांनीं त्यांना कोणतें दान दिलें ? रामदासांनीं त्याची परतफेड कशी केली ?

६ रामदासांनीं लिहिलेले ' मनाचे श्लोक ' वाचा व पाठ करा.

२५७८